मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

**अंक ९५ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ सप्टेंबर २०१३**

**वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in**

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार, श्रावणमास म्हणजे ऊन-पाऊस, फुलांचा दरवळणारा गंध, हिरवीगार वनश्री, कोसळणारे धबधबे, देव-देवतांची व्रतवैकल्ये, गोडधोडाची जेवणे, समस्त सृष्टीला मोहिनी घालणारा, मनावर मांगल्याचा, पावित्र्याचा आणि निर्मलतेचा साज चढविणाऱ्या व्रतराज श्रावणाने आपल्या जीवनामध्ये आशा, उत्साह आणि आनंद निर्माण केला आणि आता विघ्नविनाशक, सुखकर्ता, मंगलमूर्ती श्रीगणेशाचे पूजन घराघरातून केले जात आहे. श्रीगणेश आपल्या कुलबांधवांना सुख, समृद्धी व निरोगी आयुष्य देवो ही श्रीचरणी प्रार्थना.




**रविवार दिनांक ११ ऑगस्ट २०१३ ला स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, दादर येथे झालेली मराठे प्रतिष्ठानची वार्षिक कार्यकारिणीची सभा**

रविवार दिनांक ११ ऑगस्ट २०१३ ला स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, दादर येथे मराठे प्रतिष्ठानची वार्षिक कार्यकारिणीची सभा संपन्नतेने पार पडली. उपस्थिती चांगली होती. गुणवत्ता पारितोषिके घेण्यासाठी स्वत: विद्यार्थी जातीने हजर होते. टाळ्यांचा कडकडाटात बक्षिसे घेताना, घरातल्यांनी पाठीवर मारलेली शाबसकीची थाप त्यामुळे प्रत्येकाचा चेहरा कौतुकामिश्रित आनंदाने भरला होता. बऱ्याच वेळा होतं काय की बक्षिसे घेताना गुणवान विद्यार्थ्यांचे आजी-आजोबा किंवा पालक बक्षिसे स्वीकारतात. पण या वर्षी

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

Marathe Pratishthan


पारितोषिक प्राप्त गुणवान विद्यार्थी उपस्थित होते त्यामुळे सर्वांना विशेषत: आम्हा कार्यकारिणीवरील सभासदांना त्याचे विशेष महत्त्व वाटले. नुसते बक्षिस घेऊनच हे विद्यार्थी थांबले नाहीत तर प्रत्येकाने आपले मनोगत मोकळेपणाने मांडले आणि मराठे प्रतिष्ठानसाठी आपण काय करू शकतो याविषयी दिलखुलास चर्चाही केली. त्याचे सविस्तर वृत्त याच अंकात कार्यवाह श्री. हेमंत अरुण मराठे यांनी लिहिले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे यश 'मानसन्मान' म्हणून छापले आहे. श्री. श्रीनिवास मराठे यांनीही प्रतिष्ठानविषयी, प्रतिष्ठानच्या पुढील प्रगतीच्य वाटचालीविषयीचा आलेख त्यांच्या लेखातून मांडला आहे. त्यांनी सुचवलेले उपक्रम जर प्रत्यक्षात साकार झाले तर प्रतिष्ठानचे उद्दिष्ट्य साध्य होण्यास मदत होईल. सौ. जयश्री विनायक मराठे यांचा रुमाल हा लघुलेख उत्तम आहे. श्री. मोहन मराठे यांनी त्यांची मोठी बहीण यमूताई हिचे व्यक्तिचित्र साकार केले आहे ते अफलातूनच आहे. खरोखर मराठ्यांच्या या माहेरवाशिणीचा अभिमानच वाटतो. 'मन:शांती जर हवी तुम्हाला, दोष न द्यावा कधी कुणाला' हा सौ. वर्षा गोडबोले यांचा लेख वाचत असताना खरोखर मन अलौकिक अशा परमशांतीने ईश्वरचरणी लीन होऊ शकेल.

'साभार पोच' म्हणून आपल्या कुलबांधवांनी लिहिलेल्या, स्वत: स्वखर्चाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची नावे, त्यांचे पत्ते व फोन नंबर दिले आहेत, तरी कुलबांधवांनी त्यांच्याशी संपर्क साधून पुस्तके खरेदी करून वाचावित व त्यावरच अभिप्राय त्या लेखकांना ('हितगुज'साठी ही) अवश्य कळवावा. ही अपेक्षा व्यक्त करते.

हितगुजचे ज्यांना वर्गणीदार व्हायचे असेल त्यांनी २०००/- रु. पाठवून वर्गणीदार व्हावे अजूनही वेळ गेलेली नाही. असो,


आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे** (पृ.१२०)
८/१३ सहकार नगर, वडाळा, मुंबई, ४०००३१
फोन :२४१५०८८९
१ सप्टेंबर २०१३






वि. म. मराठे (पृ. २३५) यांचा कथासंग्रह

## 'बूमरँग'

मूल्य : रु.१२०/-
पत्ता : सौ. मेधा मराठे, श्री. वि. म. मराठे
'पद्मश्री' विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५
फोन : ०२३३-२३०००७२ * मोबाईल : ९४२०६७८९६५

ते स्वत:, पत्नी सौ. मेधा व कन्या सौ. विद्या वैशंपायन यांचा कविता संग्रह **'आमचा कविता संग्रह'**
आवृत्ती दुसरी, जून २०१३ * पृष्ठसंख्या : ३२* मूल्य : ऐच्छिक

* * * *

**सवलतीच्या किंमतीत**

* मराठे प्रतिष्ठान, मुंबई * सौ. नीलांबरी मराठे, पुणे, तसेच सांगली, सातारा, कोल्हापूर येथे उपलब्ध.
चौकशी : वि. म. मराठे, मोबाईल नं. : ९४२०६७८९६५ * ई-मेल : vithalmarathe754@gmail.com





Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठानच्या ३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

**हेमंत अरुण मराठे (पृ. २१)**

मराठे प्रतिष्ठानची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा तारीख ११ ऑगस्ट २०१३ रोजी स्वा. सावरकर सभागृह, दादर येथे फारच उत्तमरित्या पार पडली.

सुरुवातीला उपस्थिती कमी होती. मात्र बघता बघता कुलबांधव येऊ लागले आणि आमचा हुरूप वाढत गेला. एकूण ४८ कुलबांधव सभेला हजर होते. यामध्ये प्रामुख्याने तरुण वर्गाची उपस्थिती तसेच स्त्रियांची उपस्थिती लक्षणीय होती. सुरुवातीला इतिवृत्त वाचन, अहवाल व ताळेबंद मंजुरी या तांत्रिक गोष्टी संपल्यानंतर नवीन कार्यकारिणीची निवड झाली. यावेळी उल्लेखनीय म्हणजे स्वत:हून कुलबांधवांनी काम करण्यासाठी उत्साह दाखविला. सभेला सुरुवात करताना मी असे सुचविले होते की ज्यांना बोलावयाचे असेल त्यांनी प्रथम आपण स्वत: प्रतिष्ठानसाठी म्हणजे मराठे प्रतिष्ठानसाठी काय करणार? हे अगोदर सांगावे व नंतर अन्य सूचना अगर तक्रारी कराव्यात. कार्यकारिणीमधे काम करण्यासाठी श्री. श्रीनिवास मराठे, दादर, मुंबई, श्री. रमेश मराठे, पुणे, सौ. अनघा मराठे, वरसोली (अलिबाग), श्री. शैलेंद्र मराठे, दहिसर आणि सौ. प्रतिभा मराठे, नालासोपारा यांनी स्वत: उत्साह दाखवला. यासाठी जुन्या कार्यकारिणीतील काही सदस्यदेखील स्वत: काम करत राहण्यास तयार होते, त्यामुळे आमचा हुरूप नक्कीच वाढला.

त्यानंतर प्रत्येकाला बोलण्याची संधी दिली. श्री. श्रीनिवास मराठे, दादर यांनी असे सांगितले की आपण विभागवार प्रतिनिधी नेमू व त्यांच्याकडून आपणास सर्व कुलबांधवांशी संपर्क साधणे सोपे जाईल. शिवाय संगणकावर आपणास सर्व डाटाबेस व डिरेक्टरी तयार करण्याविषयी कल्पना सांगितली. श्री. सौरभ मराठे, सी.ए.,डोंबिवली यांनी असे म्हटले की तुम्ही नेहमी तरुण म्हणजेच युवा येत नाहीत असे म्हणता तर येथे असे काय आहे की युवावर्ग प्रत्येक सभेला यावा. आम्हाला शक्य होत नाही. तेवढा वेळ आपल्या व्यवसायातून काढणे शक्य होत नाही. त्याला उत्तर देताना मी असे सुचविले की तुम्ही कार्यकारिणीमधे न येता आपल्या आपल्या विभागामधील मराठे परिवारांशी संपर्क साधा. तुमच्या वयोगटामध्ये येणाऱ्या तरुण-तरुणींनी एकत्र या, चर्चा करा, तुम्हाला काय हवे ते आम्हाला माहिती नाही. तुम्हीच सांगायचे आहे, तेव्हा तुमचा विभागावार ग्रुप तयार करून स्वत: ठरवा आपल्याला काय करायचे आहे. व त्यावर आमच्याशी चर्चा करून आपण त्याला योग्य दिशा देऊ शकू.

श्रेयस मराठे हा विद्यार्थी म्हणाला की आम्ही पहिल्यांदा हाच विचार करतो, की याचा आम्हाला काय फायदा? मात्र आता असा प्रकारची चर्चा ऐकून मी स्वत: कार्य करण्यास तयार आहे. त्यानंतर त्याची मोठी बहीण शर्वरी मराठे हीनेदेखील आपण आता बी.ई. (आय.टी.) झालो आहोत, तेव्हा शक्य होईल तेवढा वेळ मराठे प्रतिष्ठानसाठी नक्की देऊ असे सांगून आश्वासित केले.

मानसी मराठे, डोंबिवली हीने आपण या वर्षी सी.ए. पूर्ण केले असून येथे आल्यानंतर फार आनंद झाला. आता आम्ही आपला वेळ अवश्य देऊ असे सांगितले.

कु. यश आचार्य याने आपले विचार उत्स्फूर्तपणे मांडले. आपल्या परिवारातील कुलबांधव अशाप्रकारे एकत्र येऊन काही कार्य करतात याचा मला अतिशय आनंद झाला असे म्हणाला.

श्री. अरुण मराठे, दादर, वय ८८ यांनी या वयात मी संगणकाशी मैत्री केली असून जरूरी पुरता तो वापरतो असे सांगितले. म्हणजेच, शिकण्यासाठी वयाचे बंधन नाही. तसेच त्यांनी मराठे प्रतिष्ठानचे मा. अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांचे गेले वर्षभर येत असलेले रमाकांत लाईफ स्केच फारच स्फूर्तीदायक असल्याचे सांगून त्यांचे अभिनंदन केले.

श्री. शरद मराठे, गोरेगाव यांनीदेखील श्री. रमाकांत विद्वांस यांचे अभिनंदन करून कोयनेसारख्या मोठ्या जलविद्युत प्रकल्पातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचे आभार मानले.

अशाप्रकारे अतिशय खेळीमेळीचा स्वरूपात सभा संपन्न झाली व सर्वांना यापुढे मराठे प्रतिष्ठानसाठी काम करण्यासाठी हुरूप देऊन गेली. यानंतर उत्कृष्ट भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला व बऱ्याच आठवणींसह व भविष्यकालीन योजना डोक्यात घेऊन सर्वजण आपापल्या घरी परतले.

बक्षीसपात्र विद्यार्था काही स्वत: हजर होते व काहींचे पालक हजर होते.

**१. कुमारी मिहिका राजेश शिंदोरे**
इ. १० वी. ९६.०८%

**२. कु. यश आचार्य**
इ. १० वी. ९२.९१%

**३. कु. श्रेयस शरद मराठे**
इ. १२वी ८६.१७%

**४. कुमारी शर्वरी शरद मराठे**
बी.ई. (आय.टी) डिस्टिंक्शन

**५. कुमारी मधुरा प्रभाकर मराठे**
एम.कॉम. ७०.००%

**६. कु. अजिंक्य अनिल मराठे**
बी.ई.(इलेक्ट्रिकल अँड टेलिकम्युनिकेशन) डिस्टिंक्शन

**७. कुमारी अरुता अभय मराठे**
एल.एल.बी. फर्स्ट क्लास

**८. कुमारी मानसी माधव मराठे**
सी.ए. पहिला प्रयत्नात

सर्वांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन

कु. वैदेही अभिजित काणे, सौ. गायत्री ग. जोशी मराठ्यांच्या माहेरवाशिणीच्या मुलीची मुलगी इ. १० वी ९२.१८% गुण मिळवून उत्तीर्ण झाली. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिचे अभिनंदन.

**हेमंत अरुण मराठे (पृ. २१)**
कार्यवाह, नालासोपारा

Marathe Pratishthan

# कार्यकारिणीचे उत्साही सदस्य श्रीनिवास अनंत मराठे यांचे मनोगत

**श्रीनिवास अनंत मराठे (पृ.३९२)**

सर्वप्रथम दिनांक ११ ऑगस्ट रोजी झालेल्या आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'कार्यकारिणी सदस्य' म्हणून माझी निवड केल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद. त्या सभेमध्ये हितगुज व मराठे प्रतिष्ठानच्या पुढील वाटचालीबद्दल साधक-बाधक चर्चा झाली. त्याचा सारांश व त्याबाबतचे मनोगत व्यक्त करतो :

**प्रतिष्ठानबद्दल :**

प्रतिष्ठानच्या वाटचालीत तरुणाईचा सहभाग अधिक असण्याच्यादृष्टीने काही प्रयत्न होणे गरजेचे वाटते. 'तरुणाईला प्रतिष्ठानकडून नक्की काय अपेक्षा आहेत.' असा वरिष्ठांचा प्रश्न तर 'आमचा सहभाग नक्की कोणत्या स्वरूपाचा असावा याबद्दल मार्गदर्शनाची अपेक्षा' अशी तरुणाईची भूमिका. आम्ही या दोघांमधील दुवा. त्यामुळे उपस्थित युवक प्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर याबाबतीत असे वाटते :

१. एकीचे बळ सर्वजण जाणतात. एकीसाठी जरूरी आहे संवाद. हा संवाद आज कुठेतरी संपुष्टात येत आहे. दोन पिढ्यांमध्ये तो जसा असायला हवा तसा तो दुर्दैवाने नाही. आज एका घरात राहणाऱ्या आईला आपल्या मुलीला शुभेच्छा देण्यासाठी फेसबुकवर जाण्याची गरज वाटते. ई-मेल, भ्रमणध्वनी, फेसबुक वगैरे माध्यमे उपलब्ध असणाऱ्या या संगणक युगात आपल्या कुलबांधवांशी संवाद एवढा दुर्मीळ का वाटावा? जर आपण संवादाचे माध्यमच बदलले तर या जराशा प्रतिकूल परिस्थितीचादेखील आपल्याला हवा तसा उपयोग करून घेता येईल. म्हणून हितगुजच्या सप्टेंबर अंकात आवाहन करून संबंधितांचे ई-मेल, भ्रमणध्वनी व पत्ते यांची माहिती ई-मेलद्वारे मागवून संकलित करावी. आपल्या कुलबांधवांशी संवाद साधण्याचा यापेक्षा सोपा मार्ग नाही, कारण प्रत्येक कुटुंबात एकजण तरी 'कॉम्प्युटर सॅवी' असेलच.

२. यानंतर प्रतिष्ठानसाठी कार्य करण्यास उत्सुक असलेल्या सभासदांची विभागवार वर्गवारी करून त्यांना आपापल्या विभागातील ३/४ कार्योत्सुक युवकांची समिती बनवून त्याद्वारे विभागातील सर्व मराठे कुटुंबियांची माहिती संकलित करण्याचे प्राथमिक उद्दिष्ट्य ठेवावे. अशा माहितीसाठी 'एक्सेल शीट' माझ्याकडे तयार आहे.

३. एकदा ही माहिती संकलित झाल्यावर आपले 'इंफ्रास्ट्रक्चर' पूर्ण होईल. मग जे काही उपक्रम आपल्याला हाती घ्यायचे आहेत त्याची प्रसिद्धी व पूर्तता दोन्ही सहज शक्य होईल.

४. कुटुंबाच्या प्रत्येक घटकासाठी काही ना काही उपक्रम हाती घेण्याचे उद्दिष्ट्य असावे. या सर्व उपक्रमांमागे एकजूट घडवून आणणे ही भावना आहे. याबाबतीत कुलबांधवांकडून काही मार्गदर्शनपर सूचनांचे स्वागतच आहे. करता येण्यासारखे काही उपक्रम म्हणजे १. ज्येष्ठांच्या समस्या जाणून त्यांचे निराकारण करण्यासाठी विभागवार मासिक संमेलन २. युवकांसाठी त्यांना भावणाऱ्या विषयावर कार्यशाळा ३. ज्येष्ठ महिलांसाठी हळदीकुंकू तर मध्यमवयीन महिलांसाठी भिशी वा इतर कार्यक्रम ४. बालकांसाठी काही स्पर्धांचे आयोजन अशा उपक्रमांसाठी पैशाचे पाठबळ कुठून आणायचे हा प्रश्नच आहे. पण इच्छा आहे तिथे मार्ग निघेलच.

५. प्रतिष्ठानच्या प्रत्येक सभासदाने हे आपले घरचे कार्य आहे असे समजून याबाबतीत सहकार्य करावे.

**हितगुजबद्दल :**

१. हितगुजच्या माध्यमातून निधी संकलन हा उद्देश कधीच नव्हता व नसेलही. परंतु वाढत्या महागाईमुळे हितगुजचे प्रकाशन व वितरण आर्थिकदृष्ट्या जिकीरीचे झाल्यानेच हितगुजची वर्गणी वाढवण्याचा निर्णय कार्यकारिणीस घेणे अनिवार्य झाले. वाढीव वर्गणी जे कुलबांधव देऊ शकलेले नाहीत, मग ते कोणत्याही कारणाने का असेना त्यांना ई-मेलद्वारा अंक मिळावा अशी सूचना मी केलेली आहे.

२. युवावर्गाचा सहभाग वाढवण्यासाठी हितगुजमध्ये काही मूलभूत बदल आवश्यक वाटतात. याबाबतीत युवकप्रतिनिधींचे मत जाणून घेणे अत्यावश्यक आहे. करता येण्यासारखे म्हणजे, विविध क्षेत्रांशी संबंधितांना बोलते आणि लिहिते करणे. आपल्या क्षेत्राशी संबंधित प्रश्न व त्याबाबत मार्गदर्शनपर लिखाण वयाचे बंधन न ठेवता कोणीही करू शकतो. हितगुज हे यासाठी व्यासपीठ बनू शकेल.

३. आपली साहित्यिक मुशाफिरी सुरू करणेही शक्य आहे. आपल्यातील कलागुणांचे प्रदर्शनही हितगुज मार्फत होऊ शकेल.

४. चुटके, वाक्प्रचार, म्हणी, थोरामोठ्यांची अवतरणे वगैरेमुळे हितगुज अधिक रंजक करणे शक्य होईल.

५. हितगुजतर्फे विविध वयोगटांसाठी विविध स्पर्धांचे (निबंध, चित्रकला इत्यादी) आयोजन करणे.

**कुलवृत्तांतासंबंधी :**

मार्च २०११ मध्ये हितगुजच्या माध्यमातून कुलवृत्तांताविषयी मी एक संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. एमटीएनएलच्या संकेतस्थळावरून मराठे आडनावाचे २५० दूरध्वनी क्रमांक काढून त्यांना फोन केले. त्यांच्या ई-मेल व मोबाईल नंबर यांची एक डिरेक्टरी बनवली व त्या सर्वांना ई-मेल करून त्यांची कौटुंबिक माहिती एक्सेल शीटमध्ये मागविली. त्याला जेमतेम पंधरा जणांनी प्रतिसाद दिल्यानंतर माझ्या उत्साहावर पाणी फिरलं. कुलवृत्तांतातील पाच-सहा घराणी सध्या प्रतिष्ठानच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. परंतु हा डाटा पीडीएफ फाईलच्या स्वरूपात असल्याने त्याचा म्हणावा तसा उपयोग होऊ शकणार नाही. त्या दृष्टीने काही शोध घेता 'Ancestry.com', 'Myheritage.com', 'Legacy.com' अशी वंशावळी दर्शवणारी काही संकेतस्थळे सापडली.

Marathe Pratishthan

त्यातल्यात्यात 'Myheritage.com' या साईटसवर कुटुंबियांच्या माहितीचा डाटाबेस अतिशय सोपे असल्याचं लक्षात आलं. अशा माहितीचे ४५-५० विविध प्रकारे वर्गीकरण शक्य आहे. उदा. आमच्या कुटुंबातील ७०-८० जणांच्या माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे वर्गवारी शक्य झाली.

१. सर्वांत तरुण या सर्वांत वृद्ध हयात/मृत व्यक्ती

२. सर्वांत तरुण/ वृद्ध हयात / मृत दाम्पत्य

३. सर्वांत तरुणपणी लग्न झालेली स्त्री / पुरुष

४. एकंदर हयात स्त्रिया / पुरुष तसेच सरासरी वय (पुरुष/स्त्री)

५. दोनपेक्षा कमी अपत्ये असलेलं युगुल, चारपेक्षा जास्त अपत्य असलेलं दाम्पत्य इत्यादि.

६. निरनिराळी आकडेवारी उदा. स्त्री/पुरुष, विवाहित/अविवाहित, तरुण/वृद्ध, हयात/मृत इत्यादि.

७. शैक्षणिक अर्हता, व्यवसाय, नोकरीपेक्षा आदींविषयी आकडेवारी.

हे व असे अनेक वर्गीकरणाचे प्रकार शक्य आहेत. यासाठी संकेतस्थळावर कुलवृत्तांत 'डाटाबेस फॉर्मेट' मध्ये उपलब्ध करणे आवश्यक आहे. कुलवृत्तांताचा हा प्रकल्प थोडाफार 'फेसबुक'च्या धर्तीवर आहे. प्रत्येक कुटुंबातील संगणक जाणकाराने संकेतस्थळावर जाऊन आपल्या सर्व कुटुंबियांचे 'प्रोफाईल अपडेट' करणे अपेक्षित आहे. यासाठी जी संगणकप्रणाली तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी सुमारे चार-साडेचार लक्ष रुपये खर्च आहे. सर्व चित्तपावन कुलवृत्तांत एकत्रित करणेसुद्धा शक्य आहे. आजमितीला सुमारे १२५-१३० कुलवृत्तांत झाले आहेत. यापैकी २५% जणांनी जरी हा खर्च पेलायचा झाल्यास प्रत्येकी १०-१५ हजारात हा प्रकल्प पूर्ण होऊ शकेल अशी आशा आहे.

प्रतिष्ठानच्या भावी वाटचालीबद्दल माझे हे मनोगत. यापैकी काय काय घडू शकेल अशी शंका उपस्थित ना करता हे आपण सर्व या सगळ्याच गोष्टी शक्य करण्याच्या निश्चयाने कामास लागूया. माझ्याशी भ्रमणध्वनीद्वारे वा ई-मेल द्वारे संपर्क साधून या संदर्भातील सर्व शंकांचे निरसन अथवा सूचना करू शकाल. त्याचे स्वागतच आहे.

भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८ ई-मेल : shriniwas_marathe@yahoo.com

**श्रीनिवास अनंत मराठे**

**(पृ.३९२)**

'श्रीनिवास', २९३ वीर सावरकर मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०२८
फोन : ०२२-२४४५८६२१

## हितगुज वर्गणीदार-देणगीदार कुलबांधवांची नावे

श्री. अरुण दत्तात्रय मराठे, पुणे, श्री. माधव यशवंत मराठे, वेंगुर्ले, सौ. गीतांजली दिलीप जोशी, पुणे, श्री. श्रीकृष्ण नारायण मराठे, पुणे, श्री. गजानन चिंतामण मराठे, पुणे, श्री. विजय भालचंद्र मराठे, पुणे, श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे, पुणे, श्री. विजय काशिनाथ मराठे, पुणे, सौ. शैलजा शां. कुलकर्णी, पुणे, श्री. कमलाकर अनंत जाईल, पुणे, श्री. उदय रामचंद्र मराठे, पुणे, श्री. विष्णू नारायण मराठे, पुणे, श्री. गजानन बाळकृष्ण मराठे, पुणे, श्री. मिलिंद सुधाकर मराठे, पुणे, श्री. मिलिंद लक्ष्मण चक्रदेव, पुणे, सौ. शैलजा शांताराम कुलकर्णी, पुणे, श्री. अविनाश दत्तात्रय मराठे, पुणे, श्री. अनिकेत अमर मराठे, पुणे, श्री. चिंतामण अनिल मराठे, पुणे, श्री. विजय काशिनाथ मराठे, पुणे, श्रीमती आशा चंद्रकांत मराठे, पुणे, श्री. अविनाश बळवंत मराठे, पुणे, श्री. अच्युत महादेव चक्रदेव, पुणे, श्रीमती शुभदा शंकर मराठे, पुणे, श्री. राजेश माधव मराठे, बोरिवली, सौ. केतकी चंद्रशेखर मराठे, नाशिक, श्री. शैलेंद्र भास्कर मराठे, दहिसर, श्री. विनायक विद्वांस, विलेपार्ले, श्री. वामनराव रामचंद्र मराठे, ग्वाल्हेर, श्री. राजीव वामनराव मराठे, डेहराडून, उत्तराखंड, श्री. सुशिलकुमार केशवराव मराठे, ठाणे, श्री. शरद अरूण मराठे, गोरेगाव, श्री. वसंतराव वाघमारे, कणकवली, सौ. प्रतिभा अशोक मराठे, नालासोपारा, श्री. अरविंद विश्वनाथ मराठे, नागपूर, श्री. दिलीप गोविंद नामजोशी, विलेपाल, श्री. प्रमोद सदाशिव खांबेटे, श्री. अविनाश दत्तात्रेय मराठे, पुणे, श्री. दत्तात्रय धोंडो मराठे, रत्नागिरी, श्री. सुधाकर नरहरी मराठे, रत्नागिरी, सौ. मधुमिता मिलिंद सरवटे, ठाणे (माहेरची चक्रदेव).

श्री. विष्णू नारायण मराठे, पुणे यांनी इमारनिधीसाठी १०,१००रु. दिले होते. परंतु वास्तूप्रकल्प स्थगित झाल्यामुळे हितगुजला देणगी म्हणून दिले त्यांचे आभार.

हितगुजला वर्गणी-देणगी दिलेल्या सर्व कुलबांधवांचे आभार. अनवधनाने एखादे नाव राहिले असल्यास क्षमस्व.

**विशेष सूचना : 'हितगुज' राखीव फंड निधी शक्यतो चेकद्वारे 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावा.तसेच मराठे प्रतिष्ठानची सारस्वत कॉपरेटिव्ह बँक, वरळी शाखा, अकाऊंट नंबर : ०१०२००१०००२२४४८ IFSC CODE : SRCB0000010 असा आहे. येथे फंड निधी जमा करा. जमा केल्यास आपले नाव कळवावे.**



Marathe Pratishthan

## विश्वस्त मंडळ

| | | दूरध्वनी/ भ्रमणध्वनी/ ई-मेल | वास्तव्य | कुवृपृ |
|---|---|---|---|---|
| १. श्री. आनंद यशवंत मराठे (२०१३ ते २०१६) | विश्वस्त | ०२२-२५४२५२४/९८६९००५७६६ | ठाणे, प. | २७७ |
| २. श्री. रमाकांत माधव विद्वांस (२०१३ ते २०१६) | विश्वस्त | ०२२-२४३०५२६०/९८२०२२४०१४<br>rmvidwans@gmail.com | माहिम, मुंबई | ६२३ |
| ३. श्री. विनायक केशव मराठे (२०१३ ते २०१६) | विश्वस्त | ०२२-२४३०३३२९/९८२००४३३२९ | वरळी, मुंबई | ०२० |
| ४. श्री. वामन गणेश मराठे (२०१३ ते २०१६) | विश्वस्त | ०२२-२५८६१७०० | पुणे | ५०३ |
| ५. श्रीमती सुलभा सुरेश मराठे (२०१३ ते २०१६) | विश्वस्त | ०२२-२४४६३०७४/९९३०३१८४८४ | माहिम, मुंबई | ३९९ |

## कार्यकारिणी सभासद

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. श्री. रमाकांत माधव विद्वांस (२०१३ ते २०१६) | विश्वस्त- कार्याध्यक्ष | ०२२-२४३०५२६०/९८२०२२४०१४<br>rmvidwans@gmail.com | माहिम, मुंबई | ६२३ |
| २. श्री. मोहन सदाशिव मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ०२२-२६४६४३५१/९८१९९६४७६५<br>mohansmarathe@gmail.com | खार,प. मुंबई | ३६५ |
| ३. श्री. सीताराम गोपाळ खांबेटे (२०१३ ते २०१६) | सभासद | ०२२-२६८३६९९४/९७५७४२९३३९<br>sitaram.khambete@gmail.com | अंधेरी, पू. मुंबई | ६७६ |
| ४. श्री. रमेश रामचंद्र मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ७५८८३२१९२६ | पुणे | २८० |
| ५. श्री. प्रभाकर दामोदर मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ०२२-२४१५०८८९/९८२०२३२०८२<br>prabhakar_marathe@yahoo.com | वडाळा, मुंबई | १२० |
| ६. डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद (संपादक हितगुज) | ०२२-२४१५०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| ७. श्री. सुरेश गोविंद मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ०२५१-२४९४९५६/९८७००१८१५० | डोंबिवली, | ७७ |
| ८. श्री श्रीनिवास अनंत मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ०२२-२४४५८६२१/९८३३२१६४६८<br>shriniwas_marathe@yahoo.comeme | दादर | ३९२ |
| ९. श्री. शैलेंद्र भास्कर मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ०२२-२८९३४४१/९८२०४०४५५४<br>sbmarathe@gmail.co | दहिसर | ०१७ |
| १०. श्री. हेमंत अरुण मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ०२५०-२४३३०३८/९२२०६९९९५७<br>hemant.a.marathe@gmail.com | नालासोपारा | ०२१ |
| ११. सौ. प्रतिभा अशोक मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ९९८७७१९६२३<br>pratibhamarathe7@gmail.com | नालासोपारा | १५० |
| १२. सौ. अनघा अनिल मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | ०२१४१-२२४५३६/८१४९६६०८२<br>marathe.ajinkya18@gmail.com | अलिबाग | १३२ |
| १३. श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे (२०१३ ते २०१६) | सभासद | | ढवळी (गोवा) | ५४१ |

Marathe Pratishthan

# RAMAKANT - PERSONAL LIFE SKETCH 6

- श्री. रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३)

## 'TECHNO-LEGAL ENGINEERING"

In 1966, I was posted at the Head Office of HCC in Mumbai to assist my boss in monitoring of existing under-ground works and tendering for new works. Because of my techno-legal background, I was also to handle construction claims.

In India, contracts for the projects undertaken by Government and Semi-government organizations are awarded by inviting competitive bids or tenders.

Preparation of tender bids is both an art as well as a science. Art it is because it necessitates human skills. Science it is because it necessitates systematic fundamental knowledge of construction techniques and experience.

Description of the work for which a tender is invited is given in the tender documents Tender documents also set out the time schedule for completion of the works and defects liability period, technical specifications governing the works, technical & commercial conditions of the contract and likely Bill of Items of Work and Quantities. Tenderer's bids consist of Quoted Price and conditions on which the price is based. During negotiations, mutually agreed deviations are formulated and contract for the work is concluded with one of the tenderers. Tender documents, quoted prices and agreed deviations therefore form the main basis of the contract. A contract is a legal entity. Stipulations in the contract are binding on all parties to a contract.

Preparation of a tender bid is a process. Initially, taking into account the time schedule for completion of the works, alternative rough programmes are formulated, appropriate methodology of construction is conceived and equipment likely to be required therefore is assessed. The most economic and viable alternative is then selected and taken up for detailed planning and costing etc.

Tenderer's quoted price consists of Direct Costs, Indirect Costs, Over-heads, Financing Costs and Profit Margin. Direct Costs are cost of materials, manpower and cost of operation of construction plant. Indirect Costs are cost of supervision, cost of infrastructure, overheads and financing costs.

Choice of appropriate construction material, their quantity and cost gets derived from the provisions stipulated in the technical specifications. Cost of operation of the plant and machinery and manpower depends on the items of work to be carried out within the stipulated time. Person preparing the tender bid has to be capable of visualizing these requirements.

Many other tender conditions have financial implications. Normally advances are paid for mobilization, purchase of plant & equipment and construction materials. Mobilization advance is paid against production of bank guarantees. Bank guarantees are required toward the initial security deposit and for conversion of security deposit deducted from payment of monthly work bills. Bank guarantees deposited towards mobilization advance get progressively released as the advance gets recovered. Bank guarantees deposited towards security deposit get released partly after completion of the works and balance after completion of defects liability period. These bank guarantees come out of the total credit limits allowed by bankers and banks charge a commission for the guarantees. Person preparing the tender bid therefore must under-stand financial implications of such tender conditions.

Advance for purchase of construction plant & equipment and construction materials is generally paid to the extent of about 80% of their value and is paid after they reach the site. The contractor is therefore required to provide for finances for the balance 20% value. Initial investments on large construction works consists of cost of plant and machinery, cost of in-frastructure like development of approach roads to work spots, creation of a temporary colony for providing office facilities and residences for project personnel, workshops for repairs and maintenance of machinery, arrangements for electric power and water, development of sources basic materials such as quarries for sand and crushed stone etc.

Large, highly mechanized works need heavy construction plant and equipment, construction camp etc. Creation of such infrastructure takes over a year and the cost runs into millions of rupees. Person preparing the tender bid has to be capable of visualizing these requirements.

Continued existence of a construction organization depends on

Marathe Pratishthan

successful completion of on going works and securing orders for new works as the works on hand get completed. Successful completion of on going works depends on accurate planning and estimation of time, costs, and requirement of resources, prepared at the time of bidding and skillful execution of the work. Orders for new works are awarded by inviting competitive bids or tenders. Securing orders for new works also therefore depends on accurate planning and estimation of time, costs, and requirement of resources, Even if a construction organization has all the required ability for efficient execution of the works, the success depends on planning and estimation of time, costs, and requirement of resources, prepared at the time of bidding. The role of the person preparing the bids is therefore vital.

Contract documents are drafted mostly by the owner with due vetting from his legal advisors. However, contracts many a times contain conditions that are either ambiguous or have an error. Legally, such ambiguities or errors have to be interpreted against the party that has drafted the contract. The Engineer representing the owner, who always has an upper hand as being the paymaster, interprets the ambi-guities or errors to his convenience. Such interpretation always results in dispute that is either referred to arbitration or competent courts.

Further there are contract conditions in the form of disclaimers. Such conditions always result into disputes that are either referred to arbitration or competent courts.

Most contracts contain description of the works and geotechnical description about the strata likely to be met with at the worksite. Project authorities spend a long time at site for carrying out surveys and layouts etc. They have ample time at hand to carry out detailed geotechnical investi-gations and provide data to the tenderers. However, such detailed investigations are rarely carried our and in most contracts a disclaimer is introduced to the effect that the information given in the contract is only for the guidance of the contractor and that the contractor is free to draw his own inferences as to the correctness or otherwise of the information and no claim on this account will be enter-tained. Practically, it is not possible for the Tenderers to carry out detailed investigations. They therefore have to rely on the information given in the tender. During execution of the work, if the conditions actually met at site are widely different and cause delays and financial hardships, the contractor submits a claim for compensations. Such claim is normally rejected and the rejection results in a dispute.

It is the responsibility of the owner to provide the work area free of any encumbrances. In many projects, contract is concluded even before the process of acquisition of land is completer or before environmental and clearances are obtained. This results in delay in commencement of work and dispute in respect of idle establishment of the contractor. There have been instances when a road project that was to be completed in three years has go extended to about eight years as the encroachments along the alignment could not be cleared.

Many a times, work bills are not paid for months together when the owner is facing cash crunch or liquidity. Contractor is therefore forced to slow down his activities which lead to unproductive expenses and result into a claim for compensation.

Most of the construction work for the Government is carried through contracts awarded to

Constructors. Such constructors are not speculators but professional organizations. Contracts presuppose reasonableness. Therefore, while quoting for the works, the constructors take into account circumstances that can be reasonably foreseen. Cir-cumstances like devaluation of Indian Rupee, change in existing laws, introduction of new laws are a few examples.

In the year 1966, Government of India announced devaluation of Indian Rupee by about 57%. Constructor of one hydro-project had planned the work on the basis of special purpose imported equipment worth Rs. 10 millions as such equipment was not available indigenously. Overnight, because of devaluation, the constructor was required to arrange for additional about Rs.6 millions. He had already drawn an advance of Rs. 8 millions as per terms of t6hye contract. He requested the project authorities for additional advance. His request was turned down. His bankers also refused to make available these financed. Finally, he was required to curtail the import. Because of lack of equipment, the progress of work got slowed and completion of the project got delayed and the constructor incurred a sumptuous loss. His claim for compensation was referred to arbi-tration and the csse was decided in his favour. However by the time he got the payment, after almost seven years.

Before Works Contract Tax became applicable in India, one state introduced the tax and made it applicable with retrospective effect.

Marathe Pratishthan

The amount of tax with retrospective was deducted by the project authorities from all ongoing contracts. Constructors went to arbitration and won the case for refund of the tax amount.

Most of the contracts contain a clause regarding Force Majeure Circumstances which include acts of God, natural calamities, declared and undeclared war or warlike situation etc. with a provision t5hat in case of operation of Force Majeure circumstances, each party to the contract is to bear own losses. Disputes start regarding extension of time of completion as even after the Force Majeure conditions end, it takes a long time to reinstate damaged infrastructure for recommencing construction.

It is necessary to support all the claims for compensation by proper documentation and correspondence. As soon as a cause for claim arises, it has to be put on record by a letters addressed to the competent authority. As and when such claims are referred to arbitration or court such letters form the basis of the claim and become part of the evidence.

It is therefore essential that the persons dealing with tendering and monitoring the projects and claims are well versed in planning and execution of construction engineering duly supported by practical knowledge of commercial laws and law of contract etc.

**- रमाकांत विद्वांस, (पृ.६२३)**
३१,गुडविल ॲश्युरन्स सोसायटी, बीपीएल मोबाईल सेंटरच्यामागे, मनमाला टँक रोड, माटुंगा (प.), दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०

## रुमाल

मी तुम्हाला एका छोट्याशा पण अत्यंत उपयोगी असणाऱ्या वस्तूबद्दल एक रंजक कथा सांगते. ती वस्तू म्हणजे आपल्या हातात असणारा रूमाल. कापडाचा चौरस तुकडा म्हणजे रूमाल. तो सुंदर, मुलायम तितकाच नाजूकसुद्धा असतो. कधी कधी ओबड धोबडसुद्धा असतो. हा साधा रूमाल पण किती त्याची कमाल आणि धमाल सुद्धा असते. त्याचा आपल्याला क्षणोक्षणी उपयोग होतो. आणि म्हणून तो मानवी मनाचा, जीवनाचा अविभाज्य घटक असतो. तो आपल्याजवळ नसेल तेव्हा क्षणोक्षणी त्याची आठवण होते.

'सरपे टोपी लाल हाथमें रेशम का रूमाल, ओ तेरा क्या कहना' एक अत्यंत फेमस हिंदी गाणे. हिंदी चित्रपटात अनेक गीतामध्ये तो चपखल बसतो. कधी तो नायक-नायिकेच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करतो, तर कधी तो नायिकेवरील प्रेमाचं प्रतिक म्हणून नायकाला सापडतो. पूर्वी खलनायकाची ओळख दाखविणारा रूमाल आता नायकाच्या गळ्यात शोभून दिसतो. कधी कधी रहस्यपटात खुनाचा पुरावा म्हणून भूमिका बजावतो. हा रूमाल चित्रपटात गुलजार असतो. एरवी कष्टकऱ्यांना, जनसामान्यांना रूमाल ठाऊक असतो तो घाम पुसण्यासाठी. कडकडीत उन्हापासून बचाव करण्यासाठी, डोक्यावर टाकला की एअरकंडिशनचा अनुभव येत नाही पण क्षणभर दिलासा मिळतो.

रूमालाचा शोध कोणी, कुठे, कसा लावला माहीत नाही. पण 'रूमाल' हा शब्द फारसी आहे. फारसी भाषेत 'रू'चा अर्थ चेहरा व 'माल' म्हणजे घासणे. थोडक्यात काय चेहरा पुसण्याचे साधन म्हणजे रूमाल. हा शब्द सर्व भाषिक लोकांनी त्याच्या नावासहित स्वीकारला. याबाबतीत रूमालाला सेक्युलर म्हणजे निधर्मी मानता येईल. सर्व धर्मातील सर्व थरातील मंडळी याचा वापर करू लागली.

मुस्लिम लोक नमाज पढताना तो डोक्यावर बांधतात, तर ख्रिश्चन लोक रूमाल हा पोशाखाचाच भाग मानतात. रस्त्याने चालताना समोरून येणाऱ्या व्यक्तीची ओळख हा रूमाल करून देतो. उदाहरण द्यायचे झाले तर गळ्यात रंगीबेरंगी रूमाल बांधून येणारा माणूस पूजा किंवा नमाजाहून येणारा वाटतो. कधी कधी तो स्मशानातूनही येत असतो. प्रत्येक स्थळावर ते अवलंबून असते. खांद्यावर रूमाल टाकणारा आचारी किंवा हॉटेलमध्ये नोकरी करणारा असतो. रूमालाचा उपयोग चेहरा झाकण्यासाठी करणारी व्यक्ती लबाड असते.

चष्मा पुसणे, हात पुसणे, अनेकवेळा डोळ्यांत अश्रू येतात ते पुसणे, थंडीपासून रक्षण होणे, असे बहुगुणी उपयोग या रूमालाचे असतात. एकद थोडक्यात सांगायचे म्हणजे 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' असे त्याचे वर्णन करता येईल. त्याची किंमतही फार नाही पण तो वैशिष्ट्यपूर्ण आहे. हेच रूमालाच्या यशाचं गमक आहे.

**सौ. जयश्री विनायक मराठे (पृ.७०)**
६/७ श्रीकुटीर हौ.सौ. पहिला माळा, मानपाडा क्रॉस रोड, अयोध्यानगरी, डोंबिवली (पू.) दूरध्वनी : २४२४४०३



Marathe Pratishthan

# माझ्या मनात दडलेला वारकरी

- श्री. सचिन परांजपे (पालघर)

राम राम मंडळी,

लई दिसापासुन हितंच उभा राहून तुमचं सम्द्यांचं बोलणं ऐकत होतो. आवो!! लई मोठ्या मोठ्या चर्चा की रं बाबांनो तुमच्या, अध्यात्म्य काय? सगुण-निर्गुण काय? मोक्षप्राप्ती काय? अनेक विषयांवर तुम्ही समदी मंडळी अगदी बुवांसारखं बोलता... अहो बुवा म्हणजे प्रवचनवाले बुवा, आमच्या गावच्या मारुती मंदिरात ज्यांचे प्रवचन दरसाली असते ना ते बुवा... ते सुदा असंच बोलतात. मोठे मोठे शब्द वापरतात, आता आमच्यासारख्या आडण्यास्नी काय हो कळतंय त्यातलं? आमी पडलो अशिक्षित वारकरी मंडळी. गळ्यात तुळशीच्या माळा, कपाळी बुक्का आन मुखात विठुरायाचं नाम... जय हरी विठ्ठल... आमचा द्येव तोच. इठुरायाच्या पलीकडे आनं अलीकडे आमांस काय बी ठाव नाव... मोक्ष-परमार्थ-सगुण-निर्गुण आसले शब्द कवाच आमच्या कानी पडले नव्हते. पण ज्ञानोबारायानं हे सगळं ऐश्वर्य आमाला दाखवलं. आसले शब्द आनी त्याचे अर्थ कोणे एके काळी फकस्त विद्वानांचीच मिरासदारी व्हती नव्हं का? ते आमास्नी माऊलीने समजावून सांगितले येवस्तीशीर... माऊलींचं समजावणं म्हणजे पार आपल्या आईसारखं, प्रेमाने कडेवर घेऊन आमाला समजेल अशा बोबड्या बोलानं आमाला तीच काय ती समजावते. नायतर इतकं दिवसं आम्हाला कुठे काय समजायचं रं बाबांनो? मोक्ष म्हंजे काय? भक्तिमार्ग म्हंजे काय? आमास्नी कुठं ठावं होतं? माऊलीनं पार प्रेमानं परपंच आनी परमार्थाचं गणित असं काय सोडवून दिलं की आम्ही समदी मग विठुरायाच्या अगदी जवळं पोचलो...

तुमी समदी हुश्शार माणसं, लई मोठ्या मोठ्या चर्चा करता... प्रवचनं करता. पनं आमचं तसं नाय!!! माऊली आणि तुकोबाराया दोघंबी म्हनतात... परपंच आनी परमार्थ दोन्ही म्हंजे बैलगाडीची दोन चाकं हायतं. दोनी बरोबर फिरली तरंच गाडी फुडं जायंल नायतर एक सुताएवढी बी सरकायची नाय... हे अशा भाषेत सांगितलं की आमच्यासारख्या शेतकऱ्यांना लगेच समजलं, तुम्ही मोठे मोठे ग्रंथ पालथे घातले तरी हे तुम्हास्नी समजायचं नाय. मी एवढे दिवसं बघतोय ऐकतोय... तुमची गाडी चर्चेशिवाय इतर काय करतचं नाय... आवो अशानं व्हायचं कसं? येळ आणि काळ लई मोठे बाश्शा आहेत. ते सतत पुढे जातात आनी आपली साधना मागेच राहते. आता माझंच उधारणं घ्या... मी बी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, तुकोबारायांची गाथा लई येळा वाचलीये... त्यात तर इतकं ज्ञान आहे की आता तर तुमच्यासारखे पांढरपेशे माणसं म्हणे त्यावर कायबाय लिहून डागदंर का काय झालीयेत म्हणे... पण मी तुमच्यासारखं फकस्त वाचतचं राहिलो नाही... मी इचार केला की माऊली, तुकोबाराया, एकनाथ महाराज, नामदेव महाराज सगळे म्हनतात... की ''देव सर्वत्र आहे. पंढरीचा विठुराया सगळीकडे हाये... तो अनुभवायला हवा' बस्स!! मी एवढंच समजलो...आता रोज शेतावर जाण्या-आधी आंगुळ झाल्यावर परथम दोन-चार अभंग बोलतो आनं न्यारी करून घराबाहेर पडतो...आनी मंडळी तुमासं सांगतो, अहो खरंच मला जिथे तिथे तोच सावळा विठुराया दिसतो की!! अहो खरंच, मग मी त्याचं मनोभावे दर्शन घेतो. तो मला दिसतो माझ्या ढवळ्यापवळ्याच्या जोडीमध्ये, शेजारच्या शंकराप्पाच्या छोट्या पोरात, शेताकडं जाणाऱ्या माझ्या पाऊलवाटेवर असलेल्या शेवग्याच्या झाडात, माझ्या शेताच्या काळ्या मातीत... सगळीकडें मला त्योच दिसतं असतो... डोळ्यानं त्याचं दर्शन आनी मुखात त्याचंच नाव... सबंद दिवस लई झ्याक जातो बघा... कामं कशी पार पाडतात ते समजतबी नाही. याला म्हणे तुमच्या विद्वान भाषेत ''निष्काम भक्तिकर्मयोग' का काय असंच मोठ्ठं नाव हाय!! आमाला ते काय बी उलगडतं नाही... फकस्त परपंच आनं परमार्थ यांची गाठ सोडविण्यासाठी आम्ही आसेच वागतो...

तुम्ही कधी देवदर्शनाला गेला हायंत का? आवो गेला असालचं की? पण तुमचं देवदर्शन म्हणजे कपडे सावरत, एक डोळा भायेर ठेवलेल्या चपलांच्या जोडावर लक्ष देऊन, देणग्या घेऊन, फुलांचे हारतुरे घेऊन तुम्ही देवाकडं जाता... आनी मग मागण्या आणि प्रार्थनांची ही मोठ्ठी यादी पुढे सरकवता... नवस करता आणि त्याला पार जेरीस आणता... आमचं तसं नाही. आमी बी देवदर्शनाला जातो, कुटल्याबी देवळात गेलो तरी देवाच्या जागी आमाला आमचा पांडुरंगच दिसतो. आमी गरीब मानंसं... कुटल्या देणग्या नी कुठले हारतुरे? आशेच रिकाम्या हातानं जातो आनी भरल्या डोळ्यानं त्याचं दर्शन घेतो... आयुष्य सार्थकी लागतं. मी तर एकबी प्रार्थना करत नाही, म्हणतो... ''बाबा रं तु दिसलास हेच माझं पुण्य!!'' माज्या घरात काय कमी प्रश्न हायतं व्हय? शेतातला दुष्काळ, पोरांची आजारपणं, वाण्याची उधारी अनेक समस्या माझ्याम्होरं बी आ वासून उभ्या आहेत. पण मी कवाच पांडुरंगाला बोललो नाही... आहो आपलेच भोग आहेत ते आपणच नको का भोगायला? त्यात त्याने का बरं ढवळाढवळ करायची. माऊली म्हणते भोग हे भोगुनचं संपवावे म्हणजे मुक्तीचा मार्ग मोकळा होतो. मला ते पटलं... आमच्या तुकोबारायला आनी माऊलीला काय कमी प्रश्न होते का? पण त्यांचे बी प्रश्न कधी त्या विठुरायाने सोडवले नाहीत तर तुमची आमची गोष्टचं दूर राहिली. इतके व्यापताप असुनबी त्यांच्या हातून गाथा आनी ज्ञानेश्वरी लिहून घेतली की त्यानेच नव्हं का? नाही तर आपनं असल्या समस्या आल्या की हातपाय गाळून बसतो... एक शब्द तोंडातून बी फुटंना तर लिहायची गोष्टच दूर राहिली नाही का? मला तर आमच्या तुकोबांचं लई कौतुक... पोटात अर्धी भाकर असताना बी या मानसानं ''आनंदाचे डोही आनंद तरंग....'' असा अभंग कसा काय लिहिला असेल? हाच प्रश्न मला अनेकदा पडलाय.



Marathe Pratishthan

आमचा भोळा भक्तिमार्ग एकदा अनुभवायला या की आमच्यासंग वारीला... मस्तपैकी गळ्यात तुळशीमाळा, मस्तकी बुक्का आनं गोपिचंदनाचा टिळा, मुखात पांडुरंगाचं नाव...आमच्या गावापासून पंढरीची वाट कशी सोप्पी होते ते समजतबी नाय! हां पण इथं वारीत तुमच्या स्वच्छता, खान्यापिन्याचे लई हाल होतील हां, आधीच सांगून ठेवतो. गरमागरम भाकरी-भाजी खाऊन, आभाळातले तारे मोजत रात्री झोपन्याची तयारी आसेल तर येन्याच धाडस करा... नायचतर माज्या नावानं खडं फोडाल... पनं मंडळी तुम्हाला सांगतो बरं का. वारीला जी मजा येते ना ती इतर कुठेच अनुभवता यायची नाय. आरं येडा हाय मी. तिथं कामं खोळंबलीयात आनं मी इथं गप्पा छाटत बसलोय... पनं जान्यापूर्वी तुमच्यासारख्या विद्वानांना चार महत्त्वाच्या गोष्टी सांगाव्यात असं मनापासून वाटतंय... असा उपदेश करायला मी काय कोनी गुरू - पंडीत नाय पण बोलल्याविना राहावतं नाय म्हनून बोलता बघा... पटलं तर घ्या नायतर सोडून द्या...

तुमच्या त्या मोक्ष-परमार्थ-ब्रह्म-माया या गप्पा आता बासं करा... देवाचं नाव घ्या... सगळीकडे त्याला पहा... आयाबहिनींना आदर द्या... आनी नेटानं दिलेले काम करीत राहा... बास बाकी कायबी पूजाअर्चा आनी चर्चा करायची गरज नाय. देव हा खरोखर सर्वत्र आहे. तो तुमच्या माझ्यात, जळी-स्थळी सर्वत्र आहे. तो दिसेल अशी नजर मात्र असली पाहिजे. ती नजर तोच देतो हे बी खरंच पण निदान दृष्टी तशी असली पाहिजे. दृष्टी म्हणजे नजरेमागची भावना... ती मोकळी असली पाहिजे. कोनंतंबी काम करताना आधी मनाला विचारा, ''की बाबा मी हे जे काय करतोय ते माऊलीला आवडेल, पांडुरंगाला बरं वाटेल असं आहे का?'' उत्तर आपोआप येईल. जर उत्तर नाही असं आलं तर तिथं ढुंकुनबी पाहू नका आनं उत्तर हो आलं तर कसलाबी विचार न करता कामाला सुरुवात करा... एकीकडे काम आनं दुसरीकडे नाम असा परपंच केलात तर तुकोबा म्हणतो ''तेणे मुक्ती चारी साधीयेल्या...'' चला चला मंडळी शेतावर कामं लई तुंबली आहेत... लवकर निघायला हवं मला... मग काय पुढच्या खेपेस येणार ना आमच्यासंगे वारीला?

प्रेषक

श्री. यशवंत सुरेश मराठे, (पृ.३९९)
मोबाईल : ९८२००४४६३०
- सचिन परांजपे, पालघर, मोबाईल : ९८२३१२४२४२

## पुत्रवियोग

आपण आयुष्यभर जीवनसंघर्षात गुरफटलेलो असतो. भविष्याचं खूप प्लॅनिंग करीत असतो. त्या वेळी आपल्या आयुष्यातली अटळ गोष्ट म्हणजे वृद्धत्व आणि मृत्यू. याचे मात्र आपल्याला भानही राहत नाही. त्यासाठी एक आर्थिक बाब सोडली तर दुसरं कुठलंही प्लॅनिंग आपण करीत नाही. 'वेळ येईल तेव्हा बघू?' अशा नकळत असणाऱ्या विचाराने आपण त्या अप्रिय विषयाकडे दुर्लक्ष करतो. मात्र आयुष्य उतरणीला लागल्यावर या विषयाकडे लक्ष जाते. मीही आज आयुष्याच्या उतरणीवर आहे.

भूतकाळाकडे वळून पाहताना जुन्या आठवणी मनात जास्तच पिंगा घालू लागतात. त्यातील दु:खाच्या आठवणी आधी येतात. आमचा मुलगा राजेश चोवीस वर्षांचा असताना १९९५ मध्ये रेल्वे अपघातात गेला. हे आम्हाला दुसऱ्या दिवशी कळले. या आकस्मिक धक्क्याने मन विकल झाले. काही सुचेना, डोके बधीर झाले. आम्ही त्याच्यासाठी काही करू शकलो नाही. ही अपराधीपणाची भावना आमच्या मनात कायम घर करून राहिली. २३ डिसेंबरला त्याचा स्मृतीदिन होता. त्या निमित्ताने आम्ही नगरच्या स्नेहालय या लहान मुलांच्या संस्थेला काही देणगी दिली.

आज पंधरा-सोळा वर्षे झाली. आयुष्यभर ही कटू आठवण विसरू शकणार नाही. २८ डिसेंबर २०११रोजी अनुज बिडवेची ब्रिटनमध्ये हत्या झाली त्याच्या आईवडिलांवर दु:खाचा डोंगर कोसळला. आपल्या आधी आपला बाळ देवाघरी गेला हे दु:ख पचवणं सोपं आहे का? पण कुणाच्या सुखदु:खासाठी काळाला कुठे वेळ आहे? तो पुढे पळतच आहे. तेवीस-चोवीस वर्षांच्या तरुण वयात मुलामुलींना अपघाताने किंवा हत्या होऊन मृत्यू येणे ही गोष्ट आई-वडिलांना अत्यंत क्लेशदायक असते.

मृत्यू अटळ असला तरी तरुण वयात येऊ नये वाटते. हत्या, अपघात अशा बातम्या ऐकून मन विषण्ण होते. अशाप्रकारे नियतीने दिलेल्या फटकाऱ्याने मन अगतिक होते. या विचलित झालेल्या अवस्थेला मोठ्या हिंमतीनं सामोरं जावं लागतं. काळ हा सर्व दु:खावरचं औषध आहे असं म्हणतात. मनाची समजूत घालताना गीतरामायणातल्या ओळींची आठवण येते.


*'जरा मरण यातून सुटला कोण प्राणिजात। दु:खमुक्त जगला का रे कुणी जीवनात।।*

- सौ. रोहिणी वि. मराठे, २२/३ शारदा सेंटर अपार्टमेंट, फ्लॅट क्र. ४, एरंडवणा, पुणे - ४११००४
फोन - ०२०-२५४४१८०८

Marathe Pratishthan

# एक निर्व्याज प्रसन्न व्यक्तिमत्त्व लोप पावले

**सुलभा अ. मराठे**



काल २२ मे श्री. अनंत दामोदर मराठे त्यांना हे जग सोडून एक महिना झाला. त्यांच्याविषयी कितीही लिहिले, सांगितले, बोलले तरी कमी आहे, पण पत्नी म्हणून जमेला तसेच तेवढे लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे श्रद्धांजली समजा हवी तर.

'आम्ही' त्यांना अप्पा म्हणत असू. त्यांचा जन्म भोरला पंजेली राजवैद्य गोखले ह्यांच्या घरी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी १७ ऑक्टोबर १९२५ साली झाला. व्यायाम, पोहणे, कुस्ती सर्वांची आवड त्यामुळे सुदृढ शरीर, उंच लालगोरे प्रभावशाली व्यक्तिमत्त्व. जोडीला खूप बोला घेवडे व अनेक विषयांचे उत्तम ज्ञान. निराभिमानी त्यामुळे लहान-थोर, गरीब-श्रीमंत, अतिशिक्षित, अशिक्षित सर्वांशी मैत्री. जमेल तशी सर्वांना मदत करण्याची वृत्ती, शालेय शिक्षणानंतर व्ही.जे.टी.आयचा केमिकलचा एक कोर्स पूर्ण करून करिअरला खरी सुरुवात केली; पण घरची परिस्थिती बेताची असल्याने वयाच्या सोळाव्या वर्षापासून इकडे तिकडे छोट्या-मोठ्या नोकऱ्या चालूच होत्या. एक पँट, एक शर्ट, रात्री घरी आल्यावर धुवायची सकाळी तांब्यात निखारे घालून इस्त्री करून घालायचा, आणि त्यांच्या निधनानंतर डझनावारी कपडे मी देऊन टाकले. तसे पाहिले तर मिर्झापुरी लोटाच पण स्वकर्तत्व, मेहनत, सचोटीमुळे वर वर चढत 'Technical Sales Manager for Whole India' ह्या पदावरून रिटायर झाले. शून्यातून विश्व उभे केले, माहीम, मुंबई सारख्या मध्यवर्ती ठिकाणी पाच खोल्यांचा ब्लॉक, गाडी सर्व वैभव प्राप्त केले. कंपनीतर्फे स्वदेशात अनेक दौरे व विदेश वाऱ्याही झाल्या. पण माझी इच्छा पूर्ण करण्यासाठी पुन्हा आम्ही संपूर्ण भारत दर्शन व विदेश वाऱ्याही केल्या. राजधानी प्रवासाची हौस पुरविण्यासाठी दुसऱ्यांदा कुलू-मनाली टूर ही केली. प्रवासाची अत्यंत आवड, तशीच मुलांना सुचतील अशा गोष्टी सांगण्याचा हातखंडा, एकेक गोष्ट तीन-तीन दिवस चालायची पण लिहिण्याचा तेवढाच कंटाळा. नाही तर अनेक हॅरी पॉटर जन्मास आले असते व करोडपती झाले असते. पण कुणाला हौस होती करोडपती होण्याची! आई-वडिलांसह सर्व कुटुंबाचे व्यवस्थित चालू आहे, हौस-मौज होत आहे बास झाले. आर्थिक व्यवहार करणे जमलेच नाही. माझे सासरे श्री. नाना १९७८ साली गेल्यावर संसाराच्या सर्वच जबाबदारीची बागडोर माझ्या हाती देऊन स्वत: मात्र अलिप्तच राहिले. पण माझ्यावर अतूट विश्वास, दोघांनी मिळून ठरवले एकदा की त्यात ढवळाढवळ नाही. अर्थात एका व्यापारी, मालगुजार, जमीनदार व समाजकार्याची आवड असलेल्या बापाची बेटी म्हणून माझे निर्णय व आडाखे कधीच चुकले नाहीत. त्यांनी कानावरून आय क्यू काढण्याची स्वत:ची एक थिअरी शोधून काढली होती. आणि ९०% अनुमानबरोबर असायचे पण लिहिणे! नको रे बाबा!

मला प्रत्येक बाबतीत मनापासून प्रोत्साहन दिल्यामुळेच मी हिंदी पंडित, योग-शिक्षक कोर्स, लेखन, काव्यरचना, पाक कौशल्य, पोहणे वगैरेत पुढे येऊ शकले. एका खेड्यातली मी त्यांच्या देखणेपणाच्या मानाते म्हणजे शालजोडीला ठिगळच होते; पण त्यांच्या कानाच्या थिअरीवरून आम्हा दोन बहिणींचा चॉईस होत. धाकटी बहीण सुरेख पण त्यांनी मला निवडले. त्यांच्यामते बुद्धिमत्ता व उंची ही देणगी मुलांना आईकडून मिळते. अपेक्षेपेक्षा ही माझा वैयक्तिक प्रवास खूप पुढे गेल्यावर त्यांनी कधीही असूया वाटली नाही. माननीय लता मंगेशकरांनी योगासनासंबंधात मला खास भेटीला बोलावले होते; पण प्रभुकुंजाजवळ मला सोडून ते त्यांच्या डायरेक्टरकडे नेपिअसनी रोडवर निघून गेले. एखादा नवरा असता तर दीदींना भेटण्याची आयती संधी गमावली असती का?

बर्माशेलमध्ये असताना भारतातला पहिला गॅस सिलेंडर अप्पांच्याहस्ते विकला गेला. वरिष्ठांच्या इच्छेविरुद्ध जाऊन पुण्याची एजन्सी 'भावें'ना देण्याचा निर्णय किती योग्य होता हे आजही दिसते आहे. पुढील पिढीतले विजय भावे आजही त्यांचा योग्य मान राखतात. कसली ही समस्या (गॅस सिलेंडरविषयी) चुटकीसरशी सोडवतात. त्यांच्या कंपनीतर्फे (Indian Gum Ind.) भारत भरातल्या एजन्सीज त्यांच्याहस्ते दिल्या गेल्या; पण कुठेही एक पैसाही खाल्ला नाही. त्यामुळे त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत देशभरातून फोन येतच होते. रिटायर होऊन २६ वर्षे झाली तरी त्यांचा टेक्निकल सल्ला मागितला जात होता.

त्यांच्या निधनानंतर दिवस रात्र फोन व भेटीला येणाऱ्यांची रिघ लागली होती. अजूनही दर दिवशी एक तरी फोन, एक तरी व्हिजिटर येतच असतो.

संसारातली सर्व कर्तव्ये - मुलांचे, शिक्षण, नोकऱ्या, लग्न पुढे नातवंडांचे जन्म व त्यांची ही शिक्षणे पूर्ण झाल्यावर आम्ही दोघांनी मुंबईच्या धावपळीपासून थोडा दूर पुण्यास येण्याचा निर्णय



Marathe Pratishthan

घेतला तोही स्वखर्चानेच. परांजपे कन्स्ट्रक्शन कंपनीच्या ज्येष्ठ नागरिक सो. २९ ऑक्टोबर २००२ साली आम्ही इथे राहायला आलो. उद्घाटन २९ डिसेंबरला झाले. म्हणून मी आम्ही इथले आदिवासी असेच सांगते. आयुष्यातला घेतलेला हा निर्णय सर्वोत्तम असल्याचा आजही माझे मत आहे.

ह्या अकरा वर्षांत आम्ही दोघं अधिकच जवळ आलो. आजही आम्हीं मुलांवर अवलंबून नाही. उलट त्यांना होते नव्हते ते देऊनच आलो. मुलेही कर्तबगार व सुसंस्कारित आहेत. आजही आमचा सल्ला विचारला जातो.

अप्पांच्या निधनामुळे सर्वांत जास्त नुकसान कुणाचे झाले असेल तर ते माझे. माझा जिवाभावाचा सखा मला एकटीला सोडून खूप खूप दूर निघून गेला. पुन्हा परत कधी ही न येण्यासाठी २०११ नोव्हेंबरपासून ह्यांच्या चालण्या व बोलण्यात फरक जाणवायला लागला. अल्झायमर असेल असे वाटून एक महिना आयुर्वेदिक उपचार घेतले. प्रकृतीत काहीच सुधारणा झाली नाही म्हणून हा न्यूरोलॉजीचा परिणाम असावा म्हणून सह्याद्री हॉस्पिटलमध्ये दाखला झाले. एम.आर.आय नंतर मेंदूच्या डाव्या बाजूस मोठा कांद्याएवढा ट्युमर असल्याचे कळले त्यामुळे बोलणे-चालणे बंद झाले. ऑपरेशन करता येण्यासारखे होते; पण सर्वानुमते ते न करण्याचे ठरविले, पण डॉ. दिवटे (देवमाणूसच) ह्यांना दुसरा काही संशय आल्याने बावीस हजारांच्या अनेक टेस्ट झाल्यावर प्रोस्टेडचा कॅन्सर असल्याचे निदान झाले. १९-१२-२०११ला ऑपरेशन झाले. कॅन्सरसाठी दिलेली गोळी ट्यूमरला ही लागू पडली. (डॉ. दिवट्यांनी ती शक्यता वर्तवली होतीच.) ते तीन महिन्यात अगदी पूर्ववत बरे झाले. जून २०१२ला मूत्र मार्गातला अडथळा ही लेसर ऑपरेशन (डॉ. केतन पै, युरो सर्जन) द्वारे दूर झाला. मी अप्पांना त्यांच्या रोगाची पूर्ण कल्पना दिली होती. पण डिसेंबर २०११ ते मार्च २०१३ पर्यंतचे सव्वा वर्ष आम्ही दोघं फक्त सकारात्मक जगलो. आजचा दिवस आपला उद्याच उद्या. काळजीखंत काही ही नाही. लोक हार्टफेल होऊन अचानक जातात आपल्याला निदान त्याची कल्पना तरी आहे. अर्धा पेला भरलेला असल्याचा आनंद क्षणोक्षणी उपभोगला. देहदान करण्याची इच्छा त्यांनी एकदा बोलून दाखवली होती. फॉर्म आणून ठेवला होता, पण तो भरला नव्हता कुठे ठेवला तेही माहीत नव्हते. पण सर्व भावभावनांना दूर सारून मी तो शोधून काढला. आमचे मॅनेजर डॉ. ऱ्हायकर व माझ्या बहिणीचा नातू संदीप पेठे ह्यांच्या खटपटीने देहदानाची इच्छाही मला पूर्ण करता आली अशा रितीने त्यांनी माझ्या खांद्यावर टाकलेली शेवटची जबाबदारी ही माझ्या कुवतीप्रमाणे मी पार पाडली. आता त्यांना वाहिलेल शेवटची श्रद्धांजली वाहून लेख पूर्ण करते.

माझ्या प्रत्येक लेख व कवितेचे पहिले श्रोते असणाऱ्या अनंतरावांना वाहिलेली श्रद्धांजली

*गेलास अखेर आधी अलगद हात काढून*
*बासष्ठ वर्षांचा गुंता हलकेच सोडवून।।*
*विसरू कसे आणि काय*
*फेकू कश दूर आठवणींची साय।।*
*खात्री असे मज करशील निष्कंटक माझी वाट*
*तारीख घे जवळची घेवूनी चित्रगुप्ताची गाठ।।*
*सुखी तृप्त परिपूर्ण संसार आपुला*
*नेईन निभावूनी भार थोडा तू मम स्कंधी टाकला।।*
*पाझरणाऱ्या नेत्रांची भरूनी अंजुली*
*वाहते प्रेमावर श्रद्धेची स्वीकार श्रद्धांजली।।*

**-सुलभा अनंत मराठे**
अथश्री १,डी १६,
पाषाण-बाणेर लिंक रोड, पाषाण,
पुणे ४११०२१
फोन : ०२०-२५८६११४६

## सहवेदना


अविनाश पुरुषोत्तम विद्वांस (पृ.६२३) यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी रविवार दिनांक ३ मार्च २०१३ रोजी पुणे मुक्कामी अल्पशा आजारानंतर निधन झाले. त्याच्यामागे पत्नी वीणा व मुले रोहित, अमीत व सचिन, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

विजय भास्कर विद्वांस (पृ.६२३) यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी बुधवार दिनांक २२ मे २०१३ रोजी चेन्नई मुक्कामी अल्पशा आजारानंतर निधन झाले. त्याच्यामागे पत्नी अनिता, मुले अमोल,माधवी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

श्रीराम यशवंत विद्वांस (पृ.६२३) यांचे वयाच्या ६७ व्या वर्षी शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट २०१३ रोजी मुंबई मुक्कामी अल्पशा आजारानंतर निधन झाले. त्याच्यामागे पत्नी सीमा व मोठा मित्रपरिवार आहे.

मराठे प्रतिष्ठान विद्वांस कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा मृतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## मानसन्मान



सौ. नम्रता आचार्य (पृ.६२३) (श्री. विनायक व सौ. रोहिणी विद्वांस यांची कन्या) राहणार विलेपार्ले यांचा मुलगा **चि. यश संजय आचार्य** ह्याला दहावीच्या शालांत परीक्षेत ९२.९१% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.

मराठे प्रतिष्ठानतर्फे त्याला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. यशचे हार्दिक अभिनंदन!

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

दिनांक ३१ मे २०१३ ला मराठे प्रतिष्ठानची बैठक श्रीमती सुलभाताईंच्या निवासस्थानी भरली. कार्यकारिणीतील सर्व सदस्य उपस्थित होते. मागील इतिवृत्त वाचून दाखविले. श्री. ना. ज. जाईल यांच्या पत्रावर विचार विनिमय झाला. हितगुजच्या प्रकाशनातील आर्थिक अडचणीमुळे केवळ २०००रु. वर्गणी देणाऱ्या कुलबांधवांना हितगुज अंक पाठविला जाईल हा निर्णय जाईलांना चुकीचा वाटतो. त्यांच्यामते आर्थिक स्तरावर असा भेदभाव करणे योग्य नाही. संस्थेच्या प्रगतीच्या मार्गातील मोठा अडसर ठरेल. हितगुज सातत्याने चालावा म्हणून त्यांनी कायम स्वरूपी निधी असावा. मराठे प्रतिष्ठानकडे रु.१०,०००/- तीन वर्षांसाठी बिनव्याजी ठेव म्हणून द्यावी हा उपाय सुचविला होता. त्याला प्रतिसाद फक्त अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, सौ. मंजिरी जाखोटिया, कोल्हापूरचे श्री. श्रीपाद नारायण मराठे या कुलबांधवांनी १०,०००रु देऊन दिला.

श्री. मनोहर दामोदर मराठे, कानसई, अंबरनाथ यांचे पत्र वाचण्यात आले.

श्री. रमाकांत विद्वांस यांनी वर्गणी न पाठविणाऱ्यांना हितगुज पाठविणे हे अव्यवहार्य आहे. प्रतिष्ठानला परवडणारे नाही असे सांगून, वाढीव वर्गणी रु. २०००/- कुलबांधव पाठवत आहेत आणि ते चालू राहील अशी आशा व्यक्त केली.

सी. ए. श्री. प्रभाकर मराठे यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेला आयव्यय-ताळेबंद सभेपुढे सादर केला. त्यावर कार्यकारिणीत चर्चा होऊन तो सर्वानुमते मंजूर झाला. दिनांक ११ ऑगस्टची वार्षिक सर्वसाधारण सभा ठरवली. गेली आणि चहा-फराळाने सांगता झाली.

---

शुक्रवार दिनांक २६ जुलैला संध्याकाळी पाच वाजता मराठे प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांच्या निवासस्थानी बैठक भरली. कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. पत्रव्यवहार वाचन झाले. दिनांक ११ ऑगस्टच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रमावर चर्चा झाली. जेवणाचा मेनू ठरवला गेला.

डॉ. सौ. सुमेधा व श्री. प्रभाकर मराठे ह्यांनी त्यांची मुलगी मधुरा हिला एम.कॉमला ७०% मार्क मिळाले म्हणून पेढे वाटले. सुलभाताईंनी चहा-फराळ केला आणि सभेची सांगता झाली.

मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ११ ऑगस्ट २०१३ला स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, दादर येथे झाली. त्याचे सविस्तर वृत्त कार्यवाह श्री. हेमंत मराठे, अरुण मराठे (पृ.२१) ह्यांनी लिहिले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे दुर्मीळ असे ऊर्दू भाषेतील हस्ताक्षर मराठे कुलबांधवांना पाहण्यासाठी उपलब्ध करून दिले म्हणून सौ. मंजिरी श्रीनिवास मराठे ह्यांचे धन्यवाद (स्मारकाच्या कोषाध्यक्ष) हितगुजला.

विज्ञापन देणाऱ्या 'निर्माण' ग्रुपच्या सौ. सुजाता अजित मराठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी उत्कृष्ट यशस्वी उद्योजकाला बक्षीस घोषित केले आहे ते अजून कोणाला का दिले नाही याविषयी नाराजी व्यक्त केली. ज्येष्ठ कुलबांधव चित्रकार श्री. राजा मराठे (पृ. २३५) यांनी 'हितगुज'ला पाठविलेले पत्र वाचून दाखविण्यात आले. संपादिकेचा फोटो छापणे योग्य आहे हे त्यांनी अनेक मासिके, त्यावरील संपादिकांचे फोटो व स्वाक्षरी असलेले नमुने पाठवून सादर केले होते. डॉ. सौ. सुमेधा मराठे यांनी 'हितगुज' चे वर्गणीदार व्हा असे आवाहन केले. आणि वाचकांनी पत्रे पाठवावीत, ई-मेल करावेत. कारण पत्रव्यवहार हा नियतकालिक जिवंत असल्याचे लक्षण आहे असे सांगितले.

शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०१३ ला मराठे प्रतिष्ठानची बैठक संध्याकाळी पाच वाजता श्री. श्रीनिवास अनंत मराठे यांच्या निवासस्थानी शिवाजीपार्क, दादर येथे भरली. कार्यकारिणीचे सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व उपस्थित होते. कार्यवाह हेमंत मराठे यांनी मागील इतिवृत्त वाचून दाखविले. दिनांक ११ ऑगस्ट वार्षिक सर्वसाधारण सभेचा खर्च मंजूर केला. तो खर्च श्री. रमाकंत विद्धांस व श्री. आनंदराव मराठे यांनी दिला. या मीटिंगमध्ये नवीन कार्यकारिणीची निवड ठरविली गेली. कार्यकारिणी सदस्यांनी प्रतिष्ठानसाठी काय काय कामे करायची, आपल्या भागात प्रतिनिधी नेमून गट स्थापन करायचे यावर विचारविनिमय झाला. श्रीनिवास मराठे यांनी प्रतिष्ठानच्या कार्याविषयी त्यांच्या योजना विस्ताराने मांडल्या. कुलवृत्तांचे काम ते करीत आहेत. डाटाबेसविषयी त्यांनी सविस्तर सांगितले. कार्यकारिणीतील नवीन सदस्य सौ. प्रतिभा अशोक मराठे, नालासोपारा व श्री. शैलेंद्र भास्कर मराठे, दहिसर यांनी आपापला परिचय करून दिला.

अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस आणि कार्यवाह श्री. मोहनराव मराठे यांचा वाढदिवस होता म्हणून खास केक कापून त्यांना सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

उपमा, खमंग चिरोटे या स्वादिष्ट फराळानंतर चहापानाने सभा संपली.

## मानसन्मान

**कु. अरुता अभय मराठे**

(पृ.२७७) ही एप्रिल २०१३ मध्ये एल.एल.बी.च्या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा अरुताचे हार्दिक अभिनंदन!



Marathepratishthan

# यमूताई

**श्री. मोहन मराठे, खार (पृ. ३६५)**

यमूताई माझी मोठी बहीण. तिच्या माझ्या वयात तेरा वर्षांचे अंतर. आमच्या एकत्र कुटुंबात (वडील-चुलते) तेरा भावंडे. माझी सर्वांत मोठी सख्खी बहीण व सर्वांत धाकटी चुलत बहीण त्यांच्या वयातील अंतर ४१ वर्षे. असो मागे मी आपणाला माझ्या मुकुंदा ह्या भावाची हितगुजमध्ये ओळख करून दिली होती. त्याच्या निधनानंतर पुढच्याच महिन्यात (फेब्रुवारी २०११) निधन पावलेल्या यमूताई ह्या माझ्या मोठ्या (दोन नंबरच्या) बहिणीबद्दल सांगणार आहे.

यमूताई गोरीपान व लांबसडक केसांची होती. घरातील सर्व मोठ्यांची ती लाडकी होती. अर्थात तिचे भरपूर कौतुक झाले. स्वभावाने ती बंडखोर होती. ब्राह्मण गल्लीत राहूनही तिची चर्मकार समाजातील सुलोचना रोकडे ह्या मुलीशी घट्ट मैत्री होती. तिच्या मांडीला मांडी लावून दरवाज्यात बसायची. शाळेत गळ्यात गळा घालून बरोबर जायची. शास्त्रीबुवा धर्माधिकारी ह्यांनी आमच्या घरी पूजा सांगणे बंद केले. दादांनी, माझ्या वडिलांनी यमूताईला विरोध केला नाही. आपल्यात राहिल्याने रोकडेला चांगले वळण लागेल म्हणायचे. सुलोचना व्यवस्थित राहायची. अभ्यास करायची.

ताईला चित्रकलेची आवड होती. कविता करायची आवडत होती. बार्शीला कीर्तनकार निजामपूरकर बुवांच्यावर तिने कविता करून रात्री त्यांच्या कीर्तनात सर्वांसमोर म्हटली. निजामपूरकर बुवांच्या डोळ्यांत आनंदाश्रू साठले. लग्नात ती मंगलाष्टके रचून सुरेल आवाजात गात असे. माझ्या आठवणीत आमच्या शेतातील विहिरीत पोहताना 'माझिया माहेरा जा' हे गाणे तिने गायले. गणेशोत्सवात मेळ्यात ती उत्साहाने भाग घ्यायची. मैत्रिणींबरोबर अंगतीपंगती, सहली अशा कार्यक्रमांचा तिचा धूमधडाका होता.

बार्शीला शंकराचार्यांचे आगमन व मुक्काम झाला. भगवंत मंदिरातील कार्यक्रमात ती व तिच्या मैत्रिणी भाग घेऊ. ह्याचवेळी बार्शीला स्वातंत्र्यवीर सावरकर आले होते. यमूताई व तिच्या मैत्रिणी ह्यांनी लेझिम कराटे प्रात्याक्षिके करून दाखवली.

ह्या निमित्ताने मला एका खास गोष्टीची आठवण होते. आमच्या गल्लीत विजेच्या तारेला शॉक लागून एक मोठे वानर मरून लटकत राहिले. रामभक्त व हनुमान भक्तांनी त्याला उतरवून त्याला खुर्चीवर बसवून हारतुरे घालून वाजत-गाजत प्रेतयात्रा काढली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी बार्शी येथे नंतर आले असता ह्याची कठोर शब्दात निर्भत्सना केली.

यमूताई बार्शीला सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलमध्ये शिकली. ही शाळा 'कर्नाटक लिंगराज एज्युकेशन सोसायटी - बेळगाव ही चालवत होती. बेळगावचे श्री. भीमराव (भीमाण्णा) नाईक ह्या शाळेत शिक्षक म्हणून आले. यमूताईच्या वर्गाला ते मराठी शिकवीत. यमूताईचे त्यांचेशी प्रेम जुळले. त्यांचेही! माझी दुसरी बहीण कुसुम एक आण्याच्या बक्षिशीत त्यांच्या चिठ्ठ्या चपाट्या पोहोचविण्याचे काम करायची. यमूताई मॅट्रीक पास होऊन त्याच शाळेत शिक्षिका म्हणून रूज झाली.

प्रेमाचा पुढचा मार्ग कठीण होता. नाना (स्मार्त की स्मार्ट) देशस्थ व ताई कोकणस्थ. त्या काळात हा वादाचा मुद्दा होता ह्याची आजच्या पिढीला कल्पना येणार नाही. त्या काळात ही 'बातमी' होती तर आजच्या काळात अमुक मुलीने सर्व रूढी, परंपरा झुगारून स्वजातीत लग्न केले ही बातमी होईल. माझ्या वडिलांचा लग्नाला विरोध होता. माझ्या मुंबईच्या एका आत्तेबहिणीने घरंदाज मराठा कुळातील मुलाशी लग्न करून ते दोघे बोटीने इराणला निघून गेले. नानांनी आडून माझ्या घरचे लोक लग्नाचे विचारतात असे सांगितले शेवटी नानांच्या वडिलांकडून 'नक्की सांगा नाहीतर आम्ही दुसरी मुलगी पाहतो' असे निर्वाणीचे पत्र आले. माझी आई व बाबा (आजोबा) लग्नाला तयार होते. शेवटी माझ्या मोठ्या भावाने वडिलांची समजूत घातली व हे लग्न बेळगावला १३ मे १९४४ला पार पडले. आई-वडील, मोठा भाऊ (व लहान मी) अशी मोजकी मंडळी लग्नाला गेलो. माझ्या आठवणीत लग्नमंडपात वानरांनी घातलेला धुमाकूळ व जेवणात प्रथम पांढरा भात, नंतर मसाले (काळा) भात, शेवटी ताकभात असा भातच भात आहे. नाना नाईक त्यांच्या मोठ्या कुटुंबात सर्वांत मोठे होते. सर्वांची जबाबदारी त्यांचेवर होती. शिक्षकाच्या तुटपुंज्या पगारात त्यांचे लहान भाऊ-बहिणी, नानांची तीन मुले अशा प्रपंचाचा गाडा चालवावा लागे. ते सतत उद्योगी, हसतमुख, विनोदी, दुसऱ्यांना मदत करण्यात सदैव तत्पर होते. ताईला कामाचा धबडगा, तिखट खाणे जड वाटायचे. माहेरचा ओढा वाटायचा.

आपली तीन लहान मुले, कपडे सामानाचा मिलिटरीचा पेटारा ह्यासह ती बार्शीचा (व परतीचा) प्रवास बेळगाव ते मिरज (मीटर गेज), मिरज ते बार्शी नॅरोगेज असा जवळजवळ चोवीस तासांचा प्रवास ती कसा करत असेल ह्याचे आजही मला आश्चर्य वाटले. एकदा बेळगावला परत गेल्यावर स्टेशनवर डब्यातून तिने 'हमाल' अशी आरोळी दिली आणि 'ओ' म्हणून नाना नाईक तत्परतेने पुढे आले.

मला बेळगावला जायला आवडायचे. कॉलेजच्या सुट्टीत मी बेळगावला जात असे. रस्त्यासमोरच्या दारातून आत उंबऱ्यामागे उंबऱ्यांची रांग व शेवटचे अंगण दिसायचे. लोणी, मेथीकूट लावून केलेले पोहे, आंबे, फणस, करवंदे, लाल-पिवळी चुटूक काजूबुरटी हा रानमेवा, आलेपाक. फुटाण्याची चटणी ह्याबरोबर उसाचा कासंडीभर रस बाजूला शेतात बसून पिताना खूप मजा यायची. भाज्या वजनावर नव्हे तर ढिगांनी मिळायच्या. हवा इतकी थंड की उन्हाळ्यात मी ब्लँकेट घेऊन झोपत असे. खरोखर गरीबांचे महाबळेश्वर आणि स्वस्त शहर होते (आणि आहे) कॅम्पमध्ये सायकलवर फिरण्यात मजा वाटायची.



Marathe Pratishthan

ताई-नाना व माझे आई-वडील ह्यांना घेऊन मी काशी विश्वेश्वर दर्शन घडवले व अलाहाबादला त्रिवेणी संगमात वेणीदान (पुन्हा दुसरे लग्न करविले.) ताई-नाना व आम्ही कारने गुजरातचा दौरा केला. तसेच कुलू-मनाली, आग्रा-मथुरा असाही दौरा केला. नानांना माझ्या प्रवास नियोजनाचे कौतुक वाटे. पैशाचा हिशेब ते चोखपणे पुरा करत. ताई प्रवासात खूप आनंदी होती.

ताई-नानांची मोठी दोन्ही मुले जयंत व किशोर संसारात स्थिरावली आहेत. धाकटा दिलीप बेळगावला वकील व्यवसायात स्थिरावला आहे, पण त्याचे लग्न झालेले नाही. नानांच्या पश्चात (१९९१) ताईला एकटेपण फार जाणवू लागले. दिलीपच्या लग्नाची व इतर दोन्ही भावांप्रमाणे संसारात स्थिर होण्याची तिला काळजी लागून राहिली होती. ताईला मी म्हणायचो दिलीपच्या लग्नाची फक्त तुला व मलाच आशा वाटते; पण दिलीपलाु वाटत नसावी. तिची ही इच्छा अपुरी राहिली. त्या आशेवरच ८० वयानंतर ती जगत होती.

यमूताईची माझ्यावर (तिच्या मनुल्यावर) खूप म्हणजे इतरांच्या डोळ्यांवर येईल अशी वाटण्यासारखी माया होती की तिला नम्रपणे सुचवायचो पण ती आपल्या मतावर ठाम असायची.८तिने जुन्या काळात लग्नाचे धाडस दाखवले त्याबद्दल मराठे परिवारातल्या मुली तिच्याकडे बिचकत; पण आदराने पाहत. फाजील बोलण्याचा वारसा तिने व आम्ही काही भावंडांनी आईकडून थोडा उचलला. तिच्या फाजील गप्पा रंगायच्या. ती नाचायची. ती म्हातारी झाली हे आम्हाला लवकर कळलेच नाही.

बेळगावला तिच्याकडे झालेली आमची भाऊबीज (ओवाळणी फॅक्टरी) बार्शीला शेतात हुरडा पार्टीत सी. गो. खांबेटेंनी प्रकाशित केलेल्या आम्ही बार्शीकर मराठे ह्या पुस्तकाचे यमूताईच्या हस्ते प्रकाशन. ताईने आमच्या बार्शीच्या भावाचा अविनाशचा एकाहत्तरीनिमित्त केलेला सत्कार तिला ८० वर्षे पूर्ण झाल्यावर आम्ही भाऊ, बहिणी, भाच्या ह्यांनी तिचा बेळगावला २००४मध्ये केलेला सत्कार, २०१० च्या दिवाळीत माझी मुलगी अनिता हिने तिला बेळगावहून बंगलोरला खास आणून केलेला सत्कार, तिच्या जुन्या गोष्टी अखंड सांगणे, गाणी म्हणणे (हे शेवटचे ठरले) माझ्या आठवणीतील अमोल ठेवा आहे.

ताई-नानांच्या देशस्थ-कोकणस्थ विवाहाबद्दल मी मागे वळून पाहतो, तेव्हा मला वाटते संसारात नाना ताईपेक्षा जास्त कोकणस्थ होते व ताई नानांच्यापेक्षा जास्त देशस्थ होती. हेच त्यांच्या सुखी संसाराचे रहस्य असावे.

**श्री. मोहन मराठे (पृ.३६५)**
५, रामभुवन, अहिंसा मार्गफोन : २६४६४३५१
मोबाईल : ९८१९९६४७६५

## वाचकांचा पत्रव्यवहार

मराठे कुलबांधवांचे मुखपत्र हितगुजचा कार्यभार आपण चांगल्या प्रकारे हाताळताना पाहून आनंद वाटतो. प्रत्येक अंकातील विविध विषयावरचं लेखन सर्वांनाच उपयुक्त असं मार्गदर्शन करीत आहे. वाचनाच्या ओघात काही विचार पुढे आले, ते आपल्यापर्यंत पोहोचविण्यासाठी हे चार शब्द

अंकाच्या मांडणीचे स्वरूप कसे असावे...

हितगुज हे मराठे परिवारातील कुलबांधव-भगिनींचे मुखपत्र आहे. येथे आपुलकीच्या नात्याने परिवारातील सुख-दु:ख. आनंदाच्या घटनांची आपुलकीने नोंद घेतली जाते. विद्यार्थ्यांच्या जीवनातील यशस्वी झेप, नोकरदार बंधू-भगिनींचे नित्याच्या वाटचालीत येणारे अनुभव, दूरदेशी विशेष नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्यांच्या जीवनलेख... या सर्वांची संपादक या नात्याने योग्य ती दखल घेतली जात आहे. वडिलकीच्या नात्याने अशी थोरामोठ्यांकडून मिळणारी कौतुकाची शाबासकी सर्वांनाच पुढे जाण्याचं बळ देत आहे. साहजिकच संपादक श्रेष्ठींची प्रत्यक्ष भेट ही थोडी अवघड असल्याने संपादकीय पृष्ठावरील आपला फोटो-स्वाक्षरी त्या व्यक्तीचं प्रत्यक्ष संवादाची तहान भागवितात.

माझा जाहिरात-कला या व्यवसायातील चित्रकार या नात्यानं मी अनेक कंपन्यांच्या मुखपत्राचं काम केलं आहे. त्यात फोटो-स्वाक्षरी हे संपादक या नात्याने त्याची प्रतिमा वाचकासमोर आली आहे. आपण हाती घेतलेलं हे व्रत असंच वृद्धींगत होत जावो. हितगुजचे पूर्वीचे संपादक श्री. लक्ष्मणराव यांचे बरोबर मी अनेक प्रसंगी वेगळ्या चालीनं कामं केलेली आहेत. नाविन्यानं मोहरलेलं पान सर्वांनाच वाचनाचा आनंद देतं. आजच्या मितीला ते सदैव बहरत ठेवायचं, हे आमच्या समस्त कुलबांधवांचं आद्य कर्तव्य आहे. सर्वांना स. नमस्कार

आपला

**राजा मराठे** (पृ.२३५)
१४ उद्यम, उद्यमकुंज सोसायटी, राणी सती मार्ग, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७ फोन : ०२२-२८७७८६३९


## मानसन्मान

कु. मिहिका राजेश शिदोरे (पृ.२६७), गोरेगाव (रुचा राजेश शिदोरे या आपल्या माहेरवाशिणीची कन्या- माहेरची साधना वामन चक्रदेव, अंधेरी) हिला २०१२च्या दहावीच्या परीक्षेत (आयसीएसई) ९६.०८% (५००पैकी ४८४) मार्क मिळाले.

ती शिकत असलेल्या गोरेगावच्या गोकुळधाम हायस्कूलमध्ये मराठी, समाजशास्त्र आणि एन्व्हायरमेंट एज्युकेशन या तीन विषयात ती पहिली आली असून एन्व्हायरमेंट एज्युकेशन या विषयात तिला १००पैकी १०० मार्क मिळाले. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा मानसीचे हार्दिक अभिनंदन!

Marathe Pratishthan

# मानसन्मान



चि. समीर केशव मराठे ह्याला माध्यमिक शालांत दहावीच्या परिक्षेत ९६% गुण मिळाले. मराठे प्रतिष्ठानतर्फे त्याला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा समीरचे हार्दिक अभिनंदन!



कु. मानसी माधव मराठे ही मे २०१३मध्ये झालेल्या सी.ए.फायनलमध्ये पहिल्या प्रयत्नाच उत्तीर्ण झाली. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा मानसीचे हार्दिक अभिनंदन!



कु. श्रद्धागौरी श्रीपाद मराठे (पृ.५०३) हीने दहावीच्या परीक्षेमध्ये ९१.०९% गुण मिळवून श्रीराम माध्यमिक विद्यामंदिर, पडेल शाळेत पहिली आली. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा मानसीचे हार्दिक अभिनंदन!



कु. सायली रमाकांत मराठे (पृ.५०३) हीने दहावीच्या परीक्षेमध्ये ८८.९१% गुण मिळवून श्रीराम माध्यमिक विद्यामंदिर, पडेल शाळेत दुसरी आली. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा मानसीचे हार्दिक अभिनंदन!



कुमारी मधुरा प्रभाकर मराठे (पृ. १२०) हिला नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या एम.कॉमच्या परीक्षेत ७०% गुण मिळवून प्रथम श्रेणी मिळाली. मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. मधुराचे हार्दिक अभिनंदन!

(कु. मधुरा ही संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे ह्यांची मुलगी आहे.)

Marathe Pratishthan

# ‘मनःशांती जर हवी तुम्हाला, दोष न द्यावा कधी कुणाला’

**सौ. वर्षा नंदलाल गोडबोले, पुणे (पृ. १२९)**

विश्वात एक अशी शक्ती आहे की तीच हे सर्व घडवून आणते. त्या शक्तीला शरण गेल्याशिवाय, त्या शक्तीचे आर्जव केल्याशिवाय आपण काही साध्य करू शकत नाही. तपस्या, साधना, धडपड ह्या सर्व गोष्टी शरण गेल्यानंतरच्या आहेत. हे विचार आहेत गानसम्राज्ञी संगीततज्ज्ञ पंडिता किशोरी आमोणकर यांचे.

आपणही शरणभाव, समर्पणभाव मनात ठेवून एखादी गोष्ट सातत्याने, मनापासून केल्यास आपल्यालाही असा अनुभव मिळू शकतो. मग तो संगीताचा रियाज असेल, उत्तम वैचारिक लिखाण असेल, समाजोपयोगी काही चांगली कामे असतील, शांत चित्ताने केलेली देवाची पूजा, अर्चना, जप, मनन, चिंतन असेल, आपणही सामान्यजन हा अनुभव घेऊ शकतो. मानसिक समाधान, निर्भळ आनंद त्यामधून घेऊ शकतो.

दक्षिणेकडील मोठमोठ्या मंदिरात परिक्रमा करताना टप्प्याटप्प्यावर लागणारी छोटी मंदिरे आम्ही तिथे तिथे उभे राहून पाहत असताना प्रत्येक ठिकाणी तत्परतेने एक गुरूजी येत. हातात पंचारती घेऊन गाभाऱ्यातील देवाचे सर्वांना दर्शन घडवित आणि माहिती पण सांगत. ते लोकांशी उत्तम तऱ्हेने संवाद साधत असल्यामुळे आमच्या ग्रुपमधील एका बाईंनी त्यांना प्रश्न केला, ‘‘का हो, देवळात ट्युबलाईटच तुम्ही का लावत नाही?’’ त्यावर त्यांनी दिलेले उत्तर फारच समर्पक होते. कुठलीही गोष्ट माणसाला सहजगत्या मिळाली तर त्याचे महत्त्व वाटत नाही. तसेच ह्या देवदर्शनाचे आहे. या अंधाऱ्या गाभाऱ्यात जेव्हा पंचारतीच्या उजेडात आपण देवाला निरखून पाहतो तेव्हाच आपले मनही त्याचे चरणी लीन होते, एकाग्र होते. तीच गोष्ट आपल्या घरातील देवांची पूजा करून झाल्यावर आपण जेव्हा निरांजनाने त्यांना ओवाळतो तेव्हाची आहे. देव्हाऱ्यातला दिवा बंद करून हातात निरांजन घेतले आणि प्रत्येक देवासमोर ओवाळताना त्याच्या चेहऱ्यावरील भाव निरखताना जो आनंद, समाधान, शांती मिळाली त्याचे वर्णन शब्दात नाही करता येणार. ती अनुभूतीच घ्यावी लागेल.

नवऱ्या मुलाला लग्नामध्ये मिळालेली अन्नपूर्णा घरातील बाळकृष्णाजवळ ठेवली जाते. त्या बाळकृष्णाचे हसतमुख पण मिश्किल असे रूप, अन्नपूर्णेचे करारी रूप तर गणपती ही तर बुद्धीची देवता, आनंदी, उत्साही, घोड्यावर स्वार असलेल्या खंडोबा, क्षमाशील, कृपाशील, चांगल्या विचारांना प्रवृत्त करणारे आणि ते कृतीत घडवून आणणारे सद्‌गुरू महाराज दत्तगुरू!

सर्वांचेच कुलदैवत, कुलस्वामिनी अंबाबाई. तिची तुमच्यावर असलेली भेदक कृपादृष्टी आणि गर्भश्रीमंत असलेला बालाजी! सर्वांची रूपे सेकंदासेकंदाला आपण न्याहाळत असतानाच अतिशय लीन, प्रेमळ अशी नवदुर्गा माता क्षणात गोव्यात मामाच्या गावाला नेऊन आणते. दुष्ट प्रवृत्तींचा नाश आणि सत्प्रवृत्त लोकांना आश्वासक आशीर्वाद असे तिचे रूप पाहून आईची आठवण येते आणि एकूणच पूजेची सांगता समाधानी, निर्मळ आनंदाने होते. दिवसभरात एखादे तरी योग्य काम हातून घडवायला मदत करते.

आमच्या ‘सरगम संगती’ मध्ये अनेकांनी हा लेख वाचला. वेगवेगळ्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. काही मजेशीर, गमतीशीर, काही खोचक, काही निर्मळ आनंददायी. चालायचेच. व्यक्ती तितक्या प्रकृती नाही का?

एका बाईंनी विचारले, ‘‘का हो, रोज हा आनंद तुम्हाला मिळतो का? मी म्हणाले, अर्थात! आपल्याला रोज जेवणाचा आनंद नाही का मिळत? तसेच.’’

एक बाई म्हणाल्या, ‘‘आम्ही इतकी वर्षे पूजा करतोय. आम्हांला नाही बाई सुचले असे काही. त्यांचाच मुलगा लगेच म्हणाला, ‘‘आई, कोणत्याही कामात मन असावे लागते.’’

सरगममध्ये येणाऱ्या मेदिनी काळेले यांनी तर लेख वाचून एक मनोगतच लिहून मला दिले. त्यात त्या असे म्हणतात, ‘‘बरेच दिवसापासून मी देवाजवळ समई लावत नव्हते. संध्याकाळ झाली की देव्हाऱ्यातल्या दिवा ऑन करून ठेवायचे. मनात असे यायचे, की विजेचा शोध लागलेला असताना स्वत: मात्र ट्युबलाईटच्या भक्क उजेडात सर्व कामे करायची अन् देवाला मात्र त्याच पूर्वापार चालत आलेल्या मिणमिणत्या समईच्या उजेडात ठेवायचे असे नकोच. देवाला पण विजेच्या भरपूर उजेडात राहू दे. मात्र आजपासून परत समई लावेन.’’

‘‘कुठलीही गोष्ट माणसाला सहजगत्या मिळाली तर त्याचे महत्त्व वाटत नाही.’’ ही गोष्ट मात्र शंभर टक्के खरी आहे व माणसाचे जीवनदर्शन घडविणारी आहे.

परवाच त्यांनी सांगितले, ‘‘संध्याकाळी समई लावताना तुमच्या लेखाची, ओघाने तुमची, सरगम विद्यालयाची आठवण तरळून जातेच.’’

एक बाई म्हणाल्या, ‘‘किती वेळा लिहून मग फेअर केलात लेख?’’ मी म्हटले, ‘‘त्याची कृपा पाहिजे इतकेच!’’

माझे वडील डी. जी. मराठे. एक काव्यातील दोन ओळी त्यांच्या फार आवडत्या होत्या. ‘‘मन:शांती जर हवी तुम्हाला, दोष न द्यावा कधी कुणाला.’’ ते म्हणायचे. ह्याच अर्थ आपल्या मनात भिनला पाहिजे तर जीवन सुसह्य होण्यास मदत होते. पण हे मनाला बजावणे आणि अमलात आणणे अतिशय अवघड आहे. पण सातत्याने एखाद्या गोष्टीचा पाठपुरावा केल्यास आणि कोणतेही काम श्रद्धेने केल्यास काय अवघड आहे? जी बुद्धी श्रद्धायुक्त असते तिला प्रज्ञा म्हणतात, तिलाच मेधा म्हणतात. ह्या प्रज्ञेला कवच पाहिजे. त्यासाठी मनोभावे ईश्वरचरणी लीन होण्याची वृत्ती पाहिजे. मग ह्या प्रज्ञेचा प्रसाद म्हणजे सत् चित् आणि आनंद!


**- सौ. वर्षा नंदलाल गोडबोले**

**(पृ.१२९)**

संचालिका, सरगम संगीत विद्यालय

रघुनंदन, ४५, मयूर कॉलनी, कोथरूड,

पुणे ४११०३८

दूरध्वनी : ०२०-२५४३९७६४

भ्रमणध्वनी : ९८२२७५४६४०





Marathe Pratishthan

## 'वैफल्य'

*हरवलेले सूर गवसत नाहीत*
*जुळलेली मने जुळत नाहीत*
*प्रश्न उभा राहतो तो*
*जगायचे ते कुणासाठी, जगायचे ते कशासाठी ॥१॥*

*मरणमागून मिळत नाही*
*जिवंत असून जगता येत नाही*
*वैफल्याने मन पोखरत जाते*
*असलेल्या दुखण्याना आमंत्रर देणे*
*असे असले तरी जगणे हे आहेच ॥२॥*

*देवाची भेट हवी असून होत नाही*
*घडलेल्या पापांना तो काही क्षमा करीत नाही*
*कोण जाणे म्हणूनच तो पिचत ठेवत आहे*
*की मरता मरता मारीत आहे*
*असे असले तरीही जगणे आहेच ॥३॥*

*असले जीवन जगून तरी काय करायचे?*
*आले मरण त्याला हसत हसत सामोरे जायचे*
*अशी इच्छा असली तरी मरण येईपर्यंत जगणे आहेच.*

**- श्रीमती सुहासिनी ना. मराठे (पृ.१८)**
मराठे, वाडा, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण. फोन : ०२५१-२२०८४६४

## मानसन्मान



महाराष्ट्रातल्या पहिल्या (आणि एकमेव) स्त्री न्यायवैद्य तज्ज्ञ असलेल्या डॉ. सौ. वसुधा विष्णू आपटे (पृ.६२३) (शशिकला माधव विद्वांस) ह्यांना 'झी मराठी' वाहिनीने २०१३मध्ये नव्यानेच सुरू केलेला 'उंच माझा झोका' पुरस्कार दिनांक २० ऑगस्ट रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या सोहळ्यात प्रदान करण्यात आला. आधीच अनेक पुरस्कार मिळवलेल्या डॉ. वसुधाताईंच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा विराजमान झाला. स्वर्गीय रमाबाई रानडे ह्यांच्या पणती असलेल्या वसुधाताईंनी हा गौरव स्वकर्तृत्वावर मिळवलेला आहे. मराठे प्रतिष्ठानतर्फे वसुधाताईंचे हार्दिक अभिनंदन! (हितगुज मासिकाच्या ७५ व्या अंकाच्या प्रकाशनसमारंभ कार्यक्रमात वसुधाताईंची मुलाखत घेतली होती.)

## मानसन्मान

आपले कुलबांधव श्री. सुहास बळवंत मराठे, (मिरज) यांची मुलगी चि. वैशाली हिने पुणे विद्यापीठाच्या एम.स्सी. स्टॅटिसस्टिक या परिक्षेत ६२.२१% गुण व सहावा क्रमांक मिळविला आहे. तसेच त्यांचे चिरंजीव जीवन सुहान मराठे ह्याने ज्ञानगंगा कॉलेजमध्ये इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षी पुण्याला झालेल्या फिरोदिया करंडक स्पर्धेत नाटकातील गाण्याबद्दल बक्षीस मिळवले आहे. त्याला सुभाष घईंच्याहस्ते हे बक्षीस मिळाले. ही स्पर्धा अत्यंत मानाची असून ३१ वर्षे अव्याहतपणे सुरू आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा जीवनचे हार्दिक अभिनंदन! त्याचे गाणे ऐकण्याचा योग मराठे परिवाराला लवकर येवो ही अपेक्षा व सदिच्छा.

ঞ্জ

चि. श्रेयस शरद मराठे (पृ. २१) हा २०१३ मध्ये झालेल्या बारावीच्या परीक्षेमध्ये ८६.१७% गुणांनी उत्तीर्ण झाला. तसेच त्याची बहीण कु. शर्वरी शरद मराठे ही २०१३ अभियांत्रिकी (आयटी) पदवी परीक्षेमध्ये डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण झाली. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा मानसीचे हार्दिक अभिनंदन!

ঞ্জ

चि. अजिंक्य अनिल मराठे, (पृ.१३२) हा इलेक्ट्रिकल आणि टेलिकम्युनिकेशन या शाखेतून मे २०१३ ला बी.ई. डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण झाला. मराठे प्रतिष्ठानतर्फे त्याला गुणवत्ता पारितोषिक मिळाले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा अजिंक्यचे हार्दिक अभिनंदन!



Marathe Pratishthan

# कोचरे येथील श्री भावईदेवीच्या पुनः प्राणप्रतिष्ठापनेचा सोहळयाचा वृत्तांत

**प्रेषक : सौ. नीलांबरी रमेश मराठे (पृ.२८०)**

२४ जून २०१२ रोजी प्रकाश वा. पेंडसे ह्यांनी एक बैठक श्री. डॉ. विश्वास सिधये यांचेकडे आयोजित केली होती. विषय होता अंदाजे सहाशे वर्षापूर्वीच्या श्री भावईदेवीच्या मूर्तीच्या जिर्णोद्धाराचा कै. कृ. वि. पेंडसे ह्यांनी केलेल्या संशोधनातून व नंतर प्रसिद्ध केलेल्या पेंडसे कुलवृत्तांतातून पेंडसे, करंदीकर, सिद्धये, नातू, मराठे ह्यांना चालुक्य घराण्यांनी उपजीविकेकरिता कोचरे गावी काही जमीन दिली होती. पुढे काही अडचणींमुळे ती सर्व कुटुंबे गाव सोडून बाहेर पडली पण ग्रामदेवता व कुलदेवता म्हणून तिला ते विसरलेले नव्हते. लग्न, मौजीबंधन किंवा काही कार्य झालेवर सदरची मंडळी ही श्री भावई देवीची आठवण ठेवून कोचरे मुक्कामी जाऊन तिची पूजा, अभिषेक करत असतातच. पण सदरची मूर्ती ही अभिषेक, पूजा ह्यामुळे झिजलेली होती अशा मूर्तीची पूजा शक्यतो करू नये असे शास्त्र सांगते. त्यामुळे आपण सदरची मूर्ती बदलून त्या ठिकाणी नव्या मूर्तीची स्थापना करावी असा विचार प्रकाश पेंडसे ह्यांनी बैठकीत मांडला. ह्या बैठकीला श्री. व सौ. डॉ. सिधये, श्री. किशोर करंदीकर, श्री.अनिल पेंडसे, श्री. वासुदेव पेंडसे व आयोजक प्रकाश पेंडसे उपस्थित होते, सर्वांनी सदरची योजना मान्य केली व श्री भावई देवी उत्सव कमिटी मा. अनंत भास्कर पेंडसे ह्यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केली.

कोकणात प्रत्येक कार्यक्रमास देवाचा कौल घेण्याची पद्धत आहे, त्याप्रमाणे कोचरे येथील पुजारी श्री. टेंगशे गुरुजी व उत्सव कमिटीच्या सभासदांशी संपर्क केला, त्यांनी तुम्ही कोणीतरी स्वत: हजर असणेचे गरजेचे आहे असे सांगितले त्याप्रमाणे अनिल व प्रकाश पेंडसे हे कोचऱ्यास गेले परंतु काही अडचणींमुळे कौल होऊ शकला नाही. पण कुडाळचेच पडणारे श्री. वासुदेव करंदीकर हे त्यापैकीच असल्याने नंतरच्या तारखेच्या कौलाची जबाबदारी त्यांनी घेतली व त्या संबंधीचा निर्णयही कळवण्याची जबाबदारीही त्यांनी घेतली. पुढे देवीच्या कौलाचा कार्यक्रम पार पडला, आनंदाची गोष्ट देवीने उजवा कौल दिला, त्यामुळे पुढील कार्याला चालना मिळाली. कौलामध्ये मूर्तीची पुन:प्रतिष्ठापना पेंडसे ह्यांनीच करावी असा कौल आला व सदरची माहिती उत्सव कमिटीचे सभासदांनी दूरध्वनीवरून दिली.

डॉ.विश्वास सिधये ह्यांनी पत्र व्यवहाराची जबाबदारी उचलली. श्री किशोर करंदीकर ह्यांनी हिशेबाची जबाबदारी घेतली. वासुदेव भास्कर व अनिल श्रीपाद पेंडसे ह्यानी इतर कामे करायची जबाबदारी स्वीकारली. माहिती पत्रके तयार करून लोकांशी संपर्क करणे तसेच निधी जमा करणे ह्याची जबाबदारी प्रकाश पेंडसे ह्यांनी स्वीकारली. प्रकाश पेंडसे स्वत: अहमदाबाद, बडोदा, मुंबई, ठाणे, आजरा, कोल्हापूर, सांगली, मिरज, पुणे, गोवा येथे जाऊन लोकांना भेटून निधी जमा करत होते. ह्या कामी हरिपूरच्या संजय पेंडसे ह्यांनी मदत केली. आयकरातून मिळणाऱ्या सवलतीची माहिती व लागणाऱ्या कागदपत्रांची जबाबदारी करंदीकर प्रतिष्ठान ह्याचे माध्यमातून मिळवून देण्याची जबाबदारी करंदीकर प्रतिष्ठानने घेतली. सर्वांचेकडून निधी जमवताना तो धनादेशाद्वारेच घेण्याचे ठरले. पुढील बैठक विधी महाविद्यालयाचे ठिकाणी घेण्याचे ठरले. पेंडसे कुलवार्ता, करंदीकर प्रतिष्ठानचे प्राजक्त, सिधये ह्यांचे समाचार पत्रिका, मराठे ह्यांचे हितगुज ह्या ठिकाणी देवकार्य आवाहन विनामूल्य छापून त्यांनीही कार्यास हातभार लावला.

दिनांक १८-११-२०१२ रोजी विधी महाविद्यालयाचे ठिकाणी बैठक झाली सदरच्या बैठकीला अध्यक्ष व वासुदेव भास्कर उपस्थित राहू शकले नाहीत तसेच मा. बाळासाहेब ठाकरे ह्यांचे निधनामुळे पुणे बंद होते तरीसुद्धा पेंडसे समाज कल्याण मंडळाचेवतीने यशवंत गोपाळ पेंडसे हे उपस्थित होते, सदरच्या बैठकीत श्री. किशोर करंदीकर ह्यांनी रु.११०००/- चा धनादेश दिला व चि. अरुण प्र. पेंडसे ह्यांचेमार्फत रु.१००००/- धनादेश दिला गेला व निधी जमवण्यास सुरुवात झाली. धनादेश करंदीकर प्रतिष्ठान खाते क्र. २००५७१५८७७८, बँक ऑफ महाराष्ट्र,टिळक रोड, पुणे ४११०३०. ह्या नावावर द्यावेत अथवा निधी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये जमा करावा असे पत्रक सर्वांना पाठवायचे ठरले. त्याप्रमाणे सदरच्या माहितीचे निवेदन पीडीएफ फाईल करून तसेच स्वत: भेटून संबंधितांना द्यावे असे ठरले त्याप्रमाणे ई-मेल ने माहितीपत्रके पाठविली गेली. प्रकाश पेंडसे ह्यांनी मूर्तीच्या किमतीची चौकशी करून निधी जमवायचे ठरले. कुडाळचे जवळच गुडीगर नावाचे कलाकार भेटले त्यांनी मूर्ती करून द्यावयाची जबाबदारी घेतली. गावकरी व प्रतिष्ठित व्यक्तींनी योग्यप्रकारे देखरेख करू असे सांगितले. मूर्तीकरिता लागणारी शिळा आणल्या नंतर गुरुजींनी दिनांक २२-१२-२०१२ हा शुभदिवस शीळा पूजनाचा ठरवला. ह्या कार्यक्रमास

Marathe Pratishthan

अध्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत, कारण त्यांचे बंधू प्रकाश सखाराम मु. गुळधुवे ह्यांचे निधन झाले होते. त्यामुळे प्रकाश पेंडसे व किशोर करंदीकर व कोल्हापूरचे करंदीकर व त्यांचे चिरंजीव असे व कुडाळचे वासुदेव करंदीकर, हर्षद करंदीकर, श्री भावई देवी उत्सव कमिटीचे सभासद, टेंगशेगुरुजी त्या शिळा पूजनास उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर गुरुजींनी शुभतिथी काढून मूळ मूर्ती उचलण्याची तिथी नक्की केली व त्याच सुमारास नवी मूर्ती बनवून देण्याची खात्री श्री. गुडीगर ह्यांनी दिली. दिनांक २८ एप्रिल रोजी गाभाऱ्यातील मूर्ती उचलली, त्या वेळी त्या ठिकाणी चौधरी ह्या (बी.कॉम) मुलाच्या अंगात दैवीसंचार झालेला होता. (श्रद्धा का अंधश्रद्धा हा मुद्दा वेगळा) गाभारा पुरातन व फारच लहान होता, एकच व्यक्ती वाकून आत जाऊन पूजा अभिषेकास बसू शकत होती. अभिषेक करताना गुरुजींना पण आत बसता येत नव्हते त्यामुळे गाभारा मोठा करावयाचे ठरले, ती जबाबदारी चि. पप्पू चौधरी याने घेतली. ती त्याने फारच उत्तम पार पाडली. सध्या गाभाऱ्यात गुरुजी व एक जोडपे पूजा, अभिषेकास बसू शकतात.

धार्मिक विधी करण्याची जबाबदारी चि. योगेश व त्याची पत्नी सौ. उर्वी ह्यांनी घेतली. ती त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. मध्यंतरीच्या काळात मूर्ती तयार झाली अत्यंत रेखीव अशी मूर्ती तयार झाल्याचे डॉ. कोचरेकरांनी दूरध्वनीवरून सांगितले लगेच जाऊन त्याचा फोटो काढून आणला कारण त्या मूर्तीचे चांदीचे नाणे बनवावयाचे ठरले होते, सदरचा फोटो श्री. अतुल पटवर्धनांनी कोणताही खर्च न घेता काढून दिला (फक्त जाण्यायेण्याच्या खर्चात). ह्या कार्यक्रमास सुनील पेंडसे, जयंत भट ह्यांनी कोचरे येथे येऊन भरपूर मदत केली. गावकरी व टेंगशे गुरुजींनी सर्व कार्यक्रमात चांगलेच सहकार्य केले.

चैत्र वद्य अष्टमी शा.श.१९३५ बृहस्पतीवर विजय नाम संवत्सर (दिनांक २ मे २०१३) ह्या शुभ दिवशी नवी मूर्ती योगेश पेंडसे व सौ. उर्वी यो. पेंडसे ह्यांच्या शुभहस्ते स्थापन केली त्याप्रमाणे सोहळा पार पडला.

अनंत भास्कर पेंडसे (अध्यक्ष)
प्रेषक : सौ. नीलांबरी रमेश मराठे

## प्रकाशन समारंभ

श्री ज्ञानदेव सेवा मंडळाचे प्रमुख विश्वस्त श्री. वामन शंकर मराठे (पृ.२७७) (दादा मराठे) यांनी संकलित केलेल्या ओवीरीहत 'सुलभ गद्य ज्ञानेश्वरी' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ गुरुवार दिनांक २५-७-२०१३ रोजी सायंकाळी सहा वाजता मंडळाच्या निवृत्तीनाथ सभागृहात ह.भ.प.श्री. दादा मोरे तथा मोरे माऊली यांच्या शुभहस्ते आणि कृष्णभक्त श्री. दिवाकर घैसास यांच्या उपस्थितीत दिमाखात संपन्न झाला. प्रकाशन कार्यक्रमाला दोनशेहून अधिक उपस्थिती होती. ग्रंथाच्या शंभर प्रतींची लगोलग विक्री झाली.

## ओवीरहित सुलभ गद्य ज्ञानेश्वरी

**लेखक : श्री. वामन शंकर मराठे**

प्रथमावृत्ती : आषाढ, गुरूपौर्णिमा, सोमवार २२ जुलै २०१३
देणगी मूल्य : १५० रु.
पृष्ठसंख्या : ४६०
: प्रकाशक :
श्री ज्ञानदेव सेवा मंडळ, ठाणे
संत ज्ञानेश्वर पथ, पाचपाखाडी, ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी : ०२२-२५३८६७४८

★

**टीप : मराठे कुलबांधवांसाठी वामन शंकर मराठे ज्वेलर्स, ठाणे, मुलुंड येथे असलेल्या दुकानांवर ग्रंथविक्रीची व्यवस्था केली जाईल. (हितगुजवरील जाहिरात पाहणे)**

## स्वातंत्र्ययुद्धाचे सातत्य कसे टिकते?

जेव्हा जेव्हा राष्ट्र आपल्या स्वातंत्र्यार्थ उठते, जेव्हा जेव्हा स्वातंत्र्याचे बीज त्या राष्ट्राच्या पूर्वजांच्या रक्तात रुजते, जेव्हा जेव्हा ते बीज त्या राष्ट्राच्या हुतात्म्यांच्या रक्तात रुजते आणि जेव्हा जेव्हा पूर्वजांवर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्याकरिता एकतरी सुपुत्र त्या राष्ट्रात शिल्लक असतो तेव्हा तेव्हा अशा स्वातंत्र्ययुद्धाचा केव्हाही अंत होत नाही.

-स्वातंत्र्यवीर सावरकर
(१९०७ पत्रक : करंदीकर शि. ल.सावरकरचरित्र कथन १९४३ पृ.२०८-२१७)

Marathe Pratishthan

# बंदी पांडू देशपांडे

**अच्युत महादेव चक्रदेव (पृ.७३२)**

मी त्या वेळी येरवडा मध्यवर्ती कारागृहात नोकरीस होतो. कारागृहात निरनिराळे उद्योग बंदींसाठी चालू होते. या उद्योगांप्रमाणेच शेती उद्योगही होता. विणकाम, चर्मकाम, सुतारकाम, लोहारकाम, कागद कारखाना, अंधांसाठी ब्रेल लिपीतून पुस्तके तयार करणे, बेकरी उत्पादन इ.बरोबरच निरनिराळ्या ठिकाणी शेतीही होती. त्यासाठी निवडक सुमारे १५० बंदींना त्यांच्या तुकड्या करून त्या त्या शेतीचे ठिकाणी पाठवले जाई. त्यातल्या काही तुकड्या कारागृह निवासस्थाने परिसर येथेही साफसफाई, स्वच्छतेसाठी पाठविल्या जात. त्या दिवशीही नेहमीप्रमाणे कर्मचारी निवासस्थानांकडे बंदींच्या तुकड्या पाठविल्या होत्या. एका तुकडीमधून बंदी पांडू देशपांडेही कामासाठी पाठविला होता. साधारण नेमलेले आपापले काम संपवून बंदींच्या तुकड्या साधारण दुपारी चार वाजता परत येतात.

नेहमीप्रमाणे साडेचारचे सुमारास सर्व तुकड्या परत आल्या. पांडू देशपांडेची तुकडीही परतली. पण प्रवेशद्वारांतच त्या तुकडीचे रक्षकास अडवले गेले. त्या तुकडीने एक बंदी कमी पडत होता. प्रवेशद्वार रक्षकाचे म्हणणे असे होते की, त्या तुकडीमधून बारा बंदी पाठवले होते, पण तुकडीप्रमुख रक्षकाने बंदी जमा केले फक्त अकरा. सर्व तुकडीची दोनदा पुन्हा पुन्हा मोजणी झाली. पण बाराऐवजी अकराच बंदी भरत होते. एक बंदी कमी आला हे पक्के झाले. नियमानुसार सर्व ठिकाणी 'अलार्म' झाला. कारागृहात व परिसरात जिकडे-तिकडे जोरजोराने घंटानाद होऊ लागला. सर्वजण आपापले समोरचे काम बाजूला टाकून कमी पडत असलेल्या बंदीचे शोधार्थ प्रयत्न करू लागले. नेमका कोण बंदी कमी पडत होता, त्याचा तपशील मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले. तपशील मिळाला, पांडू देशपांडेनेच रक्षकाचा डोळा चुकवून यशस्वी पलायन केले होते.

या दरम्यान एक गमतीची घटना घडली. आमचे एक वरिष्ठ अधिकारी घरी काही कामानिमित्त गेले होते, ते थोडे घाई घाईनेच परत आले. त्यांचे बरोबरचे रक्षकाजवळ बंदी कपडे होते. त्यांनी खुलासा केला. त्यांना ते बंदी कपडे त्यांचे वऱ्हांड्यातच टाकून दिलेले आढळले. नुकत्याच झालेल्या बंदी पलायनाशी याचा संबंध आहे किंवा कसे असा त्यांचे मनात संशय निर्माण झाला. त्यामुळेच ते घाईघाईने परत आले. त्यांनी हेही स्पष्ट केले की त्यांचे घरामधूनही त्यांना एक नागरी पँट व शर्ट नाहीसा झालाय. त्यांनी पांडू देशपांडेचे तुकडीमधील प्रत्येक बंदीची कसून चौकशी केली व त्यांचे घरामधून कोणी बाहेर गेलेले दिसले का अशीही पृच्छा केली. यावर त्या तुकडीमधील प्रत्येकाने तशी व्यक्ती बाहेर गेलेली पाहिल्याचे सांगितले. याचा अर्थ स्पष्ट होता की पांडू देशपांडे या बंदीनेच स्वत:चा बंदी गणवेश काढून संबंधित अधिकाऱ्याचे कपडे घालून व साहेबांचे नातेवाईक म्हणून रक्षकाचा ऐटीत सलाम घेऊन राजरोसपणे पलायन केले.

यथावकाश पांडू देशपांडेचा पत्ता नोंदवहीत मिळाला व पोलीसस्टेशनशी संपर्क साधून पोलीस जीपने पांडू देशपांडेचे कसबा पेठेतील घर शोधून पांडू देशपांडेला 'रंगेहाथ' पकडून कारागृहात परत आणण्यात आले. अर्थात या पलायनाचे गुन्ह्याबद्दल त्याचेवर नवीन एक खटला भरण्यात आला व या प्रकरणात त्याची मूळची शिक्षा वाढली गेली.

असा हा बंदी पांडू देशपांडेचा पराक्रम!

**- अच्युत महादेव चक्रदेव**
कारागृह अधिक्षक,पुणे (निवृत्त), २६ शुक्रवार पेठ,
भाऊ महाराज रस्ता, पुणे ४११०३०

## सूर्य वयात आला

नारिंगी बाग फुलली आकाशात
थोडे केशर सांडले त्यात
सूर्यबाळ अजूनी आईच्या कुशीत
निजला चांदण्यांच्या दुलईत

त्याला उठविते आई
तो म्हणतो 'इतकी काय घाई'
पुन्हा पुन्हा उठविते आई

हो, हो, म्हणतो आणि
पुन्हा पुन्हा तो निजतो
म्हणतो थोडी साखरझोप घेतो

त्याचे कारण कळले मजला
सूर्य आता वयात आला
तो सृष्टीच्या प्रेमात पडला.

**- श्रीमती मृदुला सुहास मराठे, (पृ.२७७)**
'कैलास', विष्णूनगर, नौपाडा, ठाणे (प.) फोन : ९८१९०४४४६

Marathe Pratishthan

# प्रथम वर्ष पुण्यस्मरण



*आठवणी निशीदिनी सोबत असती तरी*
*कृपाकटाक्ष तुझा राहो आम्हांवरी*

श्रीपाद नारायण मराठे, बेळगाव
सौ. जयश्री (गौरी) सदाशिव परांजपे, गारगोटी
सौ. वंदना (प्रियंका) प्रकाश कुलकर्णी, कोल्हापूर

**कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे (पृ.५३८) टिळकवाडी, बेळगाव**

**निर्वाण तिथी : भाद्रपद वद्य सप्तमी तिथीनुसार यंदा ता.२६-०९-२०१३**

**मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली**

# तीर्थरूप कै. अनंत वामन मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

श्री. संजय अनंत मराठे, नाशिक
८, रिजन्सी टॉवर, शंकरनगर गंगापूर रोड,
चित्रांगण शेजारी, नाशिक ४२२०१३
फोन : ०२५३-२३४३७०९

**मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. अनंत वामन मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली**

Marathe Pratishthan

## मेसर्स. वामन शंकर मराठे प्रा. लि.

अभिवादन, १ला मजला, शिवाजी पथ, ठाणे ४००६०२
फोन नं. : ०२२-२५४२३३३७/२५४२२४९४

## वामन शंकर मराठे ज्वेलर्स

१,४ पूजाविहार को. ऑप. हौ. सो.,
राम मारुती रोड, ठाणे (प.)- ४०० ६०२
फोन नं. : ०२२-२५४२४७८६/२५५५५५५५

## वामन शंकर मराठे ज्वेलर्स

१, अंकिता, नवघर रोड, मुलुंड जिमखान्यासमोर,
मुलुंड (पू.), मुंबई - ४०० ०८१.
फोन नं. : ०२२-२१६३५७६७

E-mail : vsmarathejewellers@gmail.com
Website : www.vsmarathe.com


BOOK POST

If undelivered,
please return to

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट : www.maratheprarishthan.org


Marathe Pratishthan